
शनिवार । ८ डिसेंबर ७९ । ७५ पैसे

# माणूस



आपण प्रस्थापितविरोधी आहोत
असे सांगणाऱ्या
इंदिरा गांधी
पुन्हा प्रस्थापितातच
गुरफटू लागल्या आहेत का ?
एका इंदिराभ्यासकाचा खास लेख

पृष्ठ....४ वर

## ज्वालामुखीच्या तोंडावर...

**शिवाय....** दलितांच्या खऱ्या प्रश्नांचा वेध घेणारे पंढरपूरजवळच्या एका गावाच्या महारमंडळींनी केलेले निवेदन.

पृष्ठ...२४ वर

## सप्रेम नमस्कार....

◘ आपल्या १७ नोव्हेंबर अंकातील ' विद्यापीठ नामांतराचा स्टंट ' हा पाटीलबुवा आघळेंचा लेख वाचला. त्यानी सर्व बारीकसारीक माहिती देऊन राजकीय चित्रण यथार्थ केले ह्यात शंका नाही. मात्र ते स्वत: नामातरविरोधी की, नामातरवादी हे सांगू शकले नाहीत. कारणे अनेक असतील; परंतु त्याच्याकडून संपूर्ण लेख वाचल्यावर ' तटस्थतेची ' अपेक्षा निर्माण होत नाही.

म्हणूनच नामांतराची खरोखरी आवश्यकता आहे का व असल्यास का, ह्या प्रश्नाचा उहापोह माझ्या क्षमतेनुसार मी खालील लेखात केला आहे.

**रविंद्र वा. खरात, पुणे**

# विद्यापीठ नामांतराची आवश्यकता

आजपर्यंत प्रत्येकाच्या चालीत वेगळी चुणूक जाणवत आली आहे धनंजय कीरांच्या मते लोकमान्य टिळक पुरोगामी विचारांबद्दल फारच तटस्थ होते. बऱ्याचजणांच्या मते गांधीजीनी अस्पृश्यांना वरवर सहानुभूती दाखविली; परंतु त्यांच्या मनात अस्पृश्यांविषयी द्वेष होता. देशामध्ये अग्रेसर क्रांती करणाऱ्या ह्या नेत्याची घाबरत-घावरत चिरफाड करायला आजच्या युवकांना एक मजाच वाटते, परंतु प्रत्यक्ष अंगावर एखादा मुद्दा कोसळायला लागला की, पाल अंगावर पडल्यासारखेच ते दूर होतात.

पाटीलबुवा आंघळेंसारख्या मराठवाड्याच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात ढवळून निघालेल्या मित्राने तरी ' मी नामातरवादीही नाही व विरोधीही नाही, ' असे म्हणायला नको आहे. अर्थात त्यांनी ' नामांतरवादी ' म्हटले तर त्यांचे सवर्ण मित्र त्यांना प्रश्नांच्या फेऱ्यात गुरफटणार व ' विरोधी ' म्हटले तर दलित मित्र तुटून पडणार ! पाटीलबुवा आघळेंचीच नव्हे तर मध्यमवर्गीय बनलेल्या प्रत्येक दलित तरुणाची हीच कथा आहे.

नामांतराच्या बाबतीत मी फार विचार केला नव्हता. ' नामातर करोत अथवा न करोत, आज भाकरीचा प्रश्न महत्त्वाचा ' असे मी समजत होतो; परंतु ठराव पास झाल्यावर ज्या प्रमाणात दंगल झाली, तिने खूप मोठा आदर्श दिला.

आंबेडकर दलित समाजात जन्माला आले, पर्यायाने ते दलित जातीचे होते, म्हणून हा विरोध झाला. वरपांगी आज दलितेतर कितीही भोळघासांबाचा आव आणून ' आम्ही पुरोगामी आहोत ' असे सांगत असले तरी विसाव्या शतकातदेखील दलित व दलितेवर ह्याच्यात खूप मोठी दरी आहे हे दिसते आहे. अजूनही ह्या देशात जातीयता आहे. विसाव्या शतकाच्या यंत्रयुगातदेखील माणसाचे मूल्य ' तो कोणत्या जातीत जन्माला आला ' ह्यावरून सिद्ध होत आहे.

कदाचित दलितांनी नामांतराचा अट्टहास केला नसता. बोटावर मोजण्याइतकी दलितामधील मध्यमवर्गीय मंडळी सोडली तर आजही ' घोटभर पाणी आणि चतकोरभर भाकरीच्या तुकड्या ' साठी दलित समाज मरणाच्या यातना भोगीत असताना त्यांनी ' नामातराचा ' अट्टाहास धरावा ह्यामागे कारण आहे. आणि ते कारण हे की कोणत्याही मार्गाने का होईना, ' आम्हीही माणसेच आहोत ' हे सिद्ध करणे.

नामांतरविरोधी गोविंदराव श्रॉफ म्हणतात. ' नामांतरामुळे आमच्या भावना दुखावल्या जातात. ' भावना दुखावतात म्हणजे नेमके काय होते ? दलित नेत्याच्या नावाचे प्रमाणपत्र त्याच्या स्वयंपाकघरापर्यंत जाईल ह्याचीच काळजी ना ? अन्यथा ज्या नेत्याला संपूर्ण जगाने ' विद्वान ' म्हणून मान दिला, त्याच्या नावाला विरोध का असावा? कितीही सखोल जाण्याचा प्रयत्न केला तरी ह्याचे उत्तर एकच सापडते की, ' दलित व दलितेतर ह्यात भेदभाव नाही, परकेपणा नाही,' हा जो गैरसमज आजपर्यंत फैलावत होता तो खोटा आहे. अठराव्या शतकाइतकीच खालच्या प्रतीची समाजव्यवस्था आजही ह्या देशात आहे.

नामातरविरोधी लोकांनी पुणेकरांना आवाहन केले, ' एवढे तुम्ही नामातरवादी आहात तर तुमच्या विद्यापीठाला नाव द्या ! ' ' पुणे विद्यापीठाला आंबेडकरांचे नाव देणे योग्य आहे का ?' हा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी पुणेकर तरी धुतल्या तांदळाइतके स्वच्छ नाहीत. मराठवाड्याच्या दंगलीचे

पृष्ठ २३ वर

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : अठ्ठाविसावा
८ डिसेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## नवे शब्द–नवे आंदोलन

निवडणुकीविषयक बातम्यांनी वर्तमानपत्रे दुथडी भरून वाहत असता पुष्कळांना त्याचीच स्वप्ने पडावीत यात नवल नाही. स्वप्नांचा अर्थ सांगणाऱ्या एका पुस्तकात अशा दोन स्वप्नांचे अर्थ मला मिळाले. ती दोन स्वप्ने मी खाली देत आहे.

स्वप्न १ ले– जर तुम्ही निवडणुकीला उभे असल्याचे स्वप्न पडले तर नजीकच्या भविष्य कालात तुम्ही पुष्कळ मित्र गमावणार आहात असे समजावे.

स्वप्न २ रे– जर तुम्हास उमेदवारास मत देत असण्याचे स्वप्न पडले तर तुमच्या जीवनात लौकरच सुधारणा व प्रगती दिसणार असे समजावे.

स्वप्नांना काही अर्थ असतो, ती सूचक असतात यावर कुणाचा विश्वास असो नसो, वरील स्वप्ने व त्यांचे अर्थ पटण्याजोगे आहेत यात संशय नाही. फक्त दुसऱ्या स्वप्नात 'योग्य' या एका शब्दाची भर घालावी असे मला वाटते. म्हणजे ते स्वप्न असे होईल, 'जर **योग्य** उमेदवारास मत देत असल्याचें स्वप्न तुम्हास पडले तर तुमच्या जीवनात लौकरच सुधारणा व प्रगती दिसणार असे समजावे.'

◻

येथे योग्य उमेदवार कोणास म्हणावे हा प्रश्न येईल. उभा असणारा प्रत्येक उमेदवार आपण योग्य आहोत असेच सांगेल. तेव्हा हा यक्ष प्रश्न सोडविण्यापेक्षा जो उमेदवार उभा आहे त्यालाच '**योग्य**' करावे असा विचार लढवून, मानवेंद्रनाथ रॉय यांनी इंडियन कॉन्स्टिटयूशनच्या आपल्या ड्राफ्ट कॉन्स्टि- टयूशनमधे उमेदवाराच्या वागण्यावर नियंत्रण आणणारी लोकसमितीची कल्पना प्रथम मांडली. रॉय यांची लोकसमितीची ही कल्पना ७३ सालच्या कलकत्त्याच्या अधिवेशनात जयप्रकाशांनी आणखी पुढे नेण्याची ठरविली व ७४ साली जनतंत्रसमाज स्थापून व्यवहारात आणली.'

जनतंत्र समाजाच्या महाराष्ट्र शाखेचे कार्यवाह श्री. भा. मो. भट यांनी ही माहिती दिली. दि. १८ नोव्हेंबर १९७९ रोजी दुपारी एक वाजता स. प. कॉलेजच्या देवी रमाबाई सभागृहामधे महाराष्ट्र मतदार परिषदेचे अधिवेशन भरले होते. त्यावेळी केलेल्या प्रास्ताविकात मतदार परिषदेची पार्श्वभूमी सांगताना भट म्हणाले,

'मुरारजी देसाई सरकारवर अविश्वासाचा ठराव मांडण्यात आल्यावर ज्या घटना घडल्या त्यासंबंधी लोकमताचा आवाज उठविण्यासाठी जनतंत्र समाजाने दोन सभा आयोजित केल्या. तसेच हिंदुस्थानी आंदोलन व राजनीती अभ्यास मंडळ यांनीही सभा घेतल्या आणि लोकशाही अभ्यास मंडळ व लोकसमिती या संस्थाही आपल्यापरीने कार्य करू लागल्या. लोकशाही संरक्षक समितीनेही व्याख्याने घडवून आणली. या सर्वांनी एकत्र येऊन व्यापक स्वरूपात काम करावे या हेतूने जनतंत्र समाज, जिल्हा लोकसमिती, हिंदुस्तानी आंदोलन, राजनीती अभ्यास मंडळ, भारतीय ग्राहक पंचायत, रॅडीकल ह्यूमॅनिस्ट असोसिएशन आदी संस्थांनी ३ ऑक्टोबर १९७९ रोजी एकत्र येऊन न्या. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समन्वयसमिती स्थापन केली. समितीचे तरुण सेक्रेटरी श्री. विजय परांजपे यांनी महाराष्ट्राची मतदार परिषद भरविण्याच्या दृष्टीने खूप परिश्रम करून वृत्तपत्रांतून निवेदने प्रसिद्ध करविली. त्यांना शहरांतून व खेडयांतून चांगला प्रतिसाद मिळाला आणि त्याचमुळे आजची ही परिषद भरत आहे.'

श्री. भट यांनी गावागावांतून दीडशे पत्रे आल्याचे सांगितले. सर्व पत्रांतून 'मतदाराचे सार्वभौमत्व' ही भूमिका मान्य करून परिषदेला चालना मिळावी अशी इच्छा व्यक्त केली होती. त्या पत्रातील औरंगाबाद- कडील एका खेडयातून आलेल्या पत्रात होते 'पुण्यात होत असलेला हा (मतदार संघटनेचा) प्रयत्न राष्ट्रीय पातळीवर होणे आवश्यक आहे–ही संघटना अपक्ष व राजकारणापासून संपूर्णपणे आलिदा असावी. चोर पावलांनी देखील राजकारणाशी दूरान्वयानेही संबंध असावा.' दुसऱ्या पत्रांत होते 'या आंदोलनात ग्रामीण भागात घेण्यासारखा कोणता कार्यक्रम आहे हे मला कळवावे ही विनंती. तसे जनतंत्र समाजाचे सभासद करीन.'

◻

वरील पत्रांवरून देशातील काही लोकांनी तरी चालू राजकारणाचा किती वीट आलाय हे कळते. आपणच निवडून दिलेल्या उमेदवारांनी आपल्यालाच किती हतबल केलाय याची चीड काही लोकांना वाटत आहे यांत संशय नाही. पण यात एक गोष्ट वाईट आहे की, सत्तेच्या चढाओढीत शिरलेल्या या उमेदवारांना मतदारांना निःशक्त करून आपणही त्यांच्याबरोबर नामशेष होणार आहोत हे कळत नाही. फार वर्षांपूर्वी भारतात गणराज्ये होती त्यांचा इतिहास त्यांना

ठाऊक नाही. ती गणराज्ये जाऊन त्याजागी राजे महाराज सम्राट आले. त्यावेळी लोक व लोकप्रतिनिधी दोघांची स्वातंत्र्ये नामशेष झाली, त्यानंतर आता पंधराशे वर्षांनंतर पुन्हा लोकशाही आली. आता तीही जाण्याची वेळ आली असता लोकांनी व लोकप्रतिनिधीनी गणराज्ये जाऊन महाराजे येण्याची कारणे लक्षात ठेवावयास हवीत. आपल्या गौतम बुद्धाच्या चरित्रात धर्मानंद, कोसंबी यांनी ती कारणे दिली आहेत. गणराज्यात गावोगावचे प्रतिनिधी एकत्र बसून देशाचा कारभार करीत. हळूहळू एकच लोकप्रतिनिधी अनेक वर्षे स्थानावर राहू लागला. त्यामुळे प्रतिनिधीचे बळ वाढू लागले. गावाची सत्ता तेथील प्रतिनिधीच्या हाती येऊन तो गावाला पिळू लागला, प्रसंगी तो स्त्रियांवरही अत्याचार करू लागला. त्याची लालसा व ऐश्वर्य वाढले. लोक त्याचा तिरस्कार करीत नाइलाजाने त्याच्या सत्तेखाली राबू लागले. लोकांचा आपणास पाठिंबा नाही, आपण निर्बल झालो आहोत हे शेजारचा राजा हल्ला करून गणराज्य ताब्यात घेईपर्यंत लोकप्रतिनिधीच्या लक्षात आले नाही. लोकांनी अत्यंत उत्साहाने राजाचे स्वागत केले. त्यांना राजा बरा वाटला याचे कारण होते. एका प्रतिनिधीची लालसा एक गाव पुरवीत होते, त्यामध्ये होणाऱ्या हालांपेक्षा, एका राजाची लालसा अनेक गावांनी पुरवणं हे कमी हालाचं होतं. हा ताण कमी होण्यास लोकांना आपल्या अभिमानाची व स्वातंत्र्याची किंमत द्यावी लागली ते निराळे.

गणराज्यांचा हा धडा सर्वांनी शिकावयास हवा. खरा यापूर्वीच शिकावयास हवा होता कारण गणराज्यांचीही कथा पंचवीसशे वर्षांपूर्वीची आहे. ज्यावेळेला आपल्याकडे एका सोशॅलिस्टपक्षाचे तीन सोशॅलिस्ट पक्ष झाले, एका कम्युनिस्ट पक्षाचे तीन कम्युनिस्ट पक्ष व एका कॉंग्रेसचे तीन कॉंग्रेस पक्ष झाले तेव्हाच लोकशाहीचा बोजवारा उडाला होता. इंदिरा गांधी यांनी त्याचा फायदा उठवला इतकेच.

◘

स. प. महाविद्यालयातील रमाबाई हॉलमध्ये दि. १८ ऑक्टोबर रोजी भरलेल्या मतदार परिषदेचे उद्घाटन करताना दादा धर्माधिकारी म्हणाले,

'लोकशाही ही केवळ राजकीय पद्धतीच आहे असे नाही. तर ती उत्तम जीवनपद्धती आहे भारतात तीस वर्षांपासून चालत आलेली प्रातिनिधिक लोकशाही आज अपुरी पडत आहे. तिला सहभागात्मक स्वरूप देऊन पूर्णता आणावयास हवी होती. पण राजकीय पक्षांनी सत्तालोलुपता व स्वार्थांधता या वृत्तीनी लोकशाहीची गंगा अपवित्र करून टाकली. त्यात विचार करून मते दिली नाहीत हा मतदाराचा दोष आहे. मतदाराना त्यांच्या मतदानाच्या हक्काबरोबरच कर्तव्य आणि सहभागाची जबाबदारी समजावून सांगण्याचे काम मध्यमवर्गीयानी करावयास हवे. हेच समाज परिवर्तनाचे साधन आहे. परिवर्तनाचे कार्य दंडुक्याने होणार नाही. प्रश्न वाढतच जातील. म्हणून सर्व ठिकाणी लोकसमित्या व मतदारसंघ स्वरूपात दक्षता समित्या स्थापन करून जनप्रबोधन करावयास हवे. सुबुद्ध मतदारांचा अंकुश निवडलेल्या प्रतिनिधींवर व सरकारवर रहावयास हवा. ही आजच्या काळाची गरज आहे.'

इतक्या विस्तारानं हे व्याख्यान उद्धृत करण्याचे कारण हे आंदोलन नवीन आहे. शब्द नवीन आहेत, कोणतेही नवे आंदोलन नवीन शब्द आणते. नवे शब्द निवलेल्या श्रद्धा प्रज्वलित करतात. गौतम बुद्धाने संघ, धर्मचक्र परिवर्तन, आर्यसत्य, निर्वाण असंख्य शब्द आणले. शंकराचार्यांनीही नवे शब्द आणले. आधुनिक काळात म. गांधी व विनोबा यानी तर सर्वोदय, भूदान, सत्याग्रह, पदयात्रा, हृदयपरिवर्तन इत्यादी शब्दाची मालिकाच दिली. कुणीतरी निरनिराळ्या काळी निघालेल्या अशा शब्दांचा कोश तयार केला पाहिजे. आता पुन्हा नवे शब्द येत आहेत.

नव्या आंदोलनातील नव्या शब्दाची कल्पना निनाद माटे या जनतंत्राच्या तरुण कार्यकर्त्याशी बोलताना आली. मतदार परिषदेची कल्पना कशी निघाली हे सांगताना निनाद माटे म्हणाला, 'तीन ऑक्टोबरला एक मेळावा झाला. लोकशाहीवादी अपक्ष संघटनांनी एकत्र यावे यासाठी तो होता. तेथे समन्वय समिती स्थापन झाली. त्याला पुण्याचे प्रतिनिधी गेले होते. त्यात विजय पराजपे होता. तो पुण्याच्या मेळाव्याचा सेक्रेटरी होता. जयप्रकाश यानी ७४ साली जनतंत्रसमाज काढला. राजकीय क्षेत्राबाहेर जनआंदोलनाची ताकद असावी अशी त्यात कल्पना होती.

निनाद माटे, आंदोलनाने पेटलेला तरुण ज्या आवेशानं बोलतो, तसाच बोलत होता. तो वापरत असलेले नवे शब्द कळत नव्हते. जनतंत्र, लोकशाही संवर्धक समन्वय समिती, सहभागात्मक लोकशाही शब्द मला मनात समजावून घ्यावे लागत होते व नीटसे कळत नव्हते. मात्र त्याचा आवेश कळत होता, तो आवेश साठी ओलांडलेल्या मला, हेवा वाटणारा व जुन्या आठवणी आणून देणारा होता. भगतसिंग वगैरे क्रांतिकारकाचे वाचून आम्ही मनाने बॉंब वगैरे टाकायला गेलो होतो. किंवा मिठाच्या सत्याग्रहात नाव नोंदवायला गेलो होतो. किंवा प्रत्येक हुतात्म्याच्या दिनी शाळेवर हरताळ पाडत होतो. (हल्ली पुष्कळ लोक शाळा बंद पाडली की त्याला हरताळ न म्हणता संप केला म्हणतात. मला ते भयंकर खटकते. लघुकथेला लेख म्हणावे इतके खटकते.) किंवा बेचाळीसच्या चळवळीत अश्रुधूर खात भिरभिर हिंडलो होतो हे सारे आठवलेच. पण त्या त्या वेळी निघालेले नवीन शब्दही आठवले इंग्रजाना घालविण्याइतका आवेश दुसऱ्या कुठल्याही चळवळीला येणार नाही असे आम्हाला वाटत होते. पण मतदारांच्या चळवळीतही तो आवेश येऊ शकतो हे निनाद माटेवरून कळले.

◘

परिषदेतील भाषणात मधु मेहता भ्रष्टाचाराबद्दल बोलले. सर्वोदयाचे गोविंदराव देशपांडे म्हणाले, 'पाया हादरला आहे. एमरजन्सी आली तिनं फार नुकसान केलं—हुकूमशाही आल्यावर भाकरी व स्वातंत्र्य दोन्ही जाईल. आमच्यात नसली तरी चालेल, सरकारात लोकशाही सुरक्षित आहे असं वाटत होतं—असं म्हणतात की, बिहार व उ. प्रदेशात मतदार केंद्रावर न जाता त्यांच्या पत्रिका पेटीत येऊन पडतात.'

न्यायमूर्ती नाईक आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'सहभागात्मक लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी आता सध्याची प्रातिनिधिक लोकशाही टिकली पाहिजे. ती टिकविण्याचे काम येत्या निवडणुकीत करावयाचे आहे. जे पक्ष आणीबाणीची भाषा

करीत आहेत, न्यायालयांची अप्रतिष्ठा करीत आहेत त्याना दूर तर सारलेच पाहिजे. पण फुटीरपणा करून आश्वासनाचा भंग करणारानाही धडा शिकविला पाहिजे, हे सर्व करण्यासाठी लोकसमित्या व दक्षता समित्या यांची फार आवश्यकता आहे.

□

या परिषदेत रॉयवादी मंडळी होती, सर्वोदयवादी होती. जनसंघाची व इतरही होती. रॉयवाद्याबद्दल विशेष म्हणजे मी त्यांना अनेक वर्षांनी पुढाकार घेताना पहात होतो. रॉयने संघटना बंद करून यापुढे रॅडिकल ह्यूम्यॅनिस्टच्या लोकांनी सर्व क्षेत्रातून खाजगी तऱ्हेने आपली तत्त्वे प्रसारित करावी असे सांगितल्यापासून रॉय पक्षाचा असा कुणी म्हणताच येत नव्हता. मला स्वत.ला रॉयबद्दल आकर्षण होते. माझा एक भाऊ रॉइस्ट आहे. तसाच माझा एक मित्रही रॉइस्ट होता. त्याने लग्न न करिता रॉयच्या विचारांचा प्रचार करण्यास जीवन वाहिले. रॉयचे विचार तो इतक्या सहज सुदर तऱ्हेने सांगावयाचा की, आश्चर्य वाटावयाचे. रॉयने आपल्या विचारांनी एक नवे जग उत्पन्न केले यात संशय नाही. पंडित नेहरूंनी कितीएक रॉयचे विचार घेतले असे तेव्हा म्हटले जाई. रॉयचे राजकारणाशिवाय इतर विषयावरचे विचारही सुबुद्ध होते. शांता नावाच्या पुनर्जन्माच्या मुलीची हकीगत त्यावेळी आली होती. रॉयने मानसशास्त्रीय कारणे देऊन एखादी मुलगी मागच्या जन्माचे कसे सांगेल याचे विवरण केले होते.

दुसऱ्या महायुद्धाचे वेळी नाझीशक्तीविरुद्ध लढणाऱ्या इग्रजांना साह्य करावे अशा मतांमुळे कम्युनिस्ट व रॉयपक्ष दोघे लोकांच्या मनातून उतरले. कम्युनिस्टांनी धोरणे बदलून रशियाच्या तंत्राने ते चालतात हे जवळजवळ सिद्ध केले. रॉयवादी मात्र नाझी विरोधाबाबत ठाम होते. खरे म्हणजे कोणत्याही कारणाने आज इंदिरा गांधीना पाठिंबा देणे बरोबर ठरेल तितकेच त्यावेळी नाझीविरुद्ध लढणाऱ्याशी लढणे बरोबर होते. इतक्या वर्षांनी त्या घटनाकडे पहाताना आज असे वाटते की, इंग्रजाविरुद्धचा त्यावेळचा लढा चुकला होता की काय? आणीबाणी व इंदिरा गाधी ही त्या चुकीच्या धोरणाची फळे नाहीत ना? त्यावेळी आपण जवळजवळ नाझीच्या बाजूने लढलो हे नाकारता येत नाही त्या पापाचे आणीबाणी हे प्रायश्चित्त नव्हे ना?

□

निवडणुकीच्या वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या वाचू लागले की फार विचित्र वाटते. पानेच्या पाने हा पुढारी दुसऱ्या पक्षात गेला, दुसऱ्यातून तिसऱ्यात गेला, तो पुढारी पक्षातील फूट वाचविण्यास दिल्लीला गेला. अमका पुढारी तमक्याशी बोलताना दिसला किंवा एक दुसऱ्याकडे चहाला किंवा जेवावयास गेला. गेल्या काही महिन्यात राजकारणी लोकानी केलेल्या प्रवासाचा खर्च एक कोटी रुपये तरी होईल. ही निवडणूक मतदारांना अडचणीत आणणार यात शंका नाही. तरीही एखाद्या सस्थानात जसे राजाच्या व त्याच्या भोवतालच्या लोकाच्या लहानसहान हालचालीवर लोक बोलत राहतात तीच सरंजामी वृत्ती आपणा मतदारात अजून आहे. कोणताही पुढारी शहरात येवो ही गर्दी! रस्त्यावर बांबू लागतात, मैदानात बांबू लागतात. आपली बांबू संस्कृती होती असे पुढचे लोक म्हणतील.

यासंबंधी अमेरिकेहून जाऊन आलेले माझे मित्र वि. ग. कानिटकर यानी एक गोष्ट सांगितली. ते अमेरिकेत एका लहान गावी असता तिथे अध्यक्षपदासाठी उभे असलेले कार्टर येणार आहेत असे कळले. त्यांना वाटले, आज अमेरिकेचा निवडणूकप्रचार पहायला मिळेल. आता फुटपाथना बांबू लावले जातील, रस्ते बंद होतील, मैदानात बांबूच्या रागा व चौकोन दिसतील. स्पीकरच्या आवाजानी गाव दणाणेल, पोलिसांनी गाव फुलून निघेल.

पण जिमी कार्टर आलेला आणि गेलेलाही कळला नाही. गावात येऊन एका हॉलमध्ये पन्नाससाठ नागरिकांसमोर त्याने छोटे भाषण केले. प्रत्येकाशी हस्तांदोलन केले व तो गेला. असे लक्षात आले की, तिथे जो तो आपले काम महत्त्वाचे मानतो. पुढाऱ्यामागे धावत नाही. मत कुणाला द्यावयाचे हे उमेदवाराचे धोरण, वागणे वगैरेवरून तो ठरवितो. मी असे ऐकलाय की, इंग्लंडमध्येही हाईडपार्कवर अशाच छोटया सभा होतात. माणसे दोन मिनिटे ऐकतात पुढे जातात.

जिथे अनेक वर्षे लोकशाही रुजलेली आहे त्या देशात लोक कसे वागतात हे यावरून कळेल. याचा अर्थ आपल्याकडच्या सभा जेवढया आकारात कमी होतील, राजकीय पुढाऱ्याबद्दलची गॉसिपीगची आवड जेवढी कमी होईल तेवढी लोकशाही आपल्या देशात रुजत आहे असे ठरेल.

त्यामुळे जनतंत्राने आखलेल्या स. प. विद्यालयातील रमाबाई हॉलमध्ये भरलेल्या मतदार परिषदेत दोनशे एक लोक होते तरी मला बरे वाटले. मतदार सघटनेनं हेच लहान सभाचे धोरण चालू ठेवावे. जरी त्या परिषदांतून बोलले जाणारे, लोकशाही संवर्धक समन्वय समिती, जनतंत्र, सहभागात्मक लोकशाही असले शब्द मला नीटसे कळले नाहीत तरी मी त्या परिषदाना व सभाना जाईन. भाषणं कंटाळवाणी वाटलीच तर दोन मिनिटं उभा राहून बाहेर पडेन. आणि माझ्या कामाला लागेन. □


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

महाराष्ट्र-कर्नाटक वगैरे १।२ राज्ये सोडली तर अरस-चव्हाण काँग्रेस
जवळजवळ संपुष्टात आल्यासारखीच आहे.
चरणसिंग-मधू लिमयांचे लोकदल तर जन्मतःच मेलेले आहे.
आता अखिल भारतीय पातळीवर सामना फक्त दोघांतच उरलेला आहे.
जनता पक्ष आणि इंदिरा काँग्रेस.
इंदिरा काँग्रेस म्हणजे इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व. ते कसे आहे ?
त्यांचा राजकीय प्रवास जवळून व लांबून,
पुस्तकातून व मुलाखतीतून टिपणाऱ्या एका
अभ्यासकाने घेतलेला हा एक वेध.
जनता पक्षाने इंदिरा गांधींची ताकद नेमकी कशात आहे
हे ओळखायला हा लेख उपयुक्त ठरू शकेल !

# ज्वालामुखीच्या तोंडावर

कुमार केतकर

एका पत्रकाराला मुलाखत देताना इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, 'लहानपणापासून मला जोन ऑफ आर्कबद्दल आकर्षण वाटत आलं आहे. पंधराव्या शतकातील सर्व धर्मगुरूंनी तिला जिवंत जाळण्याचा एकमुखी निर्णय घेतला... का तर स्त्री असूनही परमेश्वर माझ्याशी संवाद करतो असे ती ठासून म्हणाली... पुरुषप्रधान समाजातील त्या धर्मगुरूंना जोनचे हे औद्धत्य सहन झाले नाही. एकोणीस वर्षांची जोन जळून मेली पण वाकली नाही.'

गेले तीन वर्ष मी एका तडफेने, ईर्ष्येने इंदिरा गांधीच्या व्यक्तिमत्त्वाचा मागोवा घेत आलो आहे, तसा तो घेताना त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे फुलत आले, विकसित होत गेले हे अभ्यासण्याचा आत्मीयतेने प्रयत्न केला आहे. इंदिरा गांधीवर टीका करणाऱ्यानाही तितक्याच बारकाईने न्याहाळले आहे.

मला असे निश्चितपणाने वाटते की, इंदिरा गांधीवरील टीकेला जरी विविध रंग दिसत असले तरी त्यातील एक सुप्त रंग स्त्रीद्वेषाचा आहे. पुरुषी अहंकार, पुरुषी सत्ता इंदिरा गांधींनी झुगारली म्हणून इतकी तीव्र, इतकी कठोर, इतकी बीभत्स टीका त्यांच्यावर झाली.

मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम इ. सर्व मंडळीही भांडवलशाहीचीच प्रतिनिधी होती पण त्यांच्यावर असा हल्ला कधीच झालेला नाही. बहुतेकवेळेस आपण पाहतो की, इतर कोणावरच्याही टीकेला धोरणाचे, विचाराचे, भूमिकेचे टोक असते. व्यक्तिगत पातळीवरही हल्ले होतात; पण तसे हल्लेही एका विशिष्ट पातळीच्या खाली जात नाहीत. इंदिरा गांधींवर हल्ला करताना मात्र जवळजवळ सर्व पक्षाच्या पुढाऱ्यांनी, वृत्तपत्रांनी सभ्यतेच्या सर्व मर्यादा सोडल्या होत्या. कम्युनिस्ट मंडळींनी आपल्या टीकेला सिद्धान्ताची कल्हई अनेक वेळा दिली पण त्याचाही स्त्रीद्वेष लपून राहू शकला नाही. New Age, Peoples' Democracy, Frontier या त्यांच्या विविध मुखपत्रातून अनेक उदाहरणं दाखवता येतील. अनेक 'स्त्रीसुलभ' विशेषणाचा वर्षाव करतच त्यांना 'क्रूर', 'स्वार्थी', 'सत्तांध' अशाच मापानी मोजण्यात येत होते. ज्या टीकाकारानी आपली टीका भूमिकाच्या, विचारसरणीच्या, धोरणांच्या मर्यादेत ठेवली होती, स्त्री द्वेषाची छटाही उमटू दिली नव्हती, त्यांची राजकीय मापने अस्सल पुरुषी अरेरावीच्या गदारोळात गाडली गेली होती आणि तरीही इंदिरा गांधी टिकून राहिल्या. त्यांना 'जाळून टाकण्यात' जनताचे सत्ताधारी यशस्वी होऊ शकले नाहीत. इंदिरा वाकली पण नाही. एका अर्थाने तीस महिन्याचे ते 'इंदिरा-द्वेष पर्व' संपत आले आहे.

□

आता आपण ज्या कालखंडात प्रवेश करणार आहोत तो कालखंड कितीतरी अधिक पटीनी उग्र असणार आहे, क्रांतिकारक असणार आहे. लोक कोणावरच विसंबण्याच्या मनःस्थितीत नसल्याने जो त्यांची साथ करेल तोच टिकणार आहे, बाकी लाव्हारसात फेकले जाणार आहेत. या लोकांची साथ इंदिरा गांधी करणार आहेत का ? या प्रश्नाचे निःसंदिग्ध उत्तर अशक्य आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना मला ज्या गोष्टी जाणवल्या त्या वाचकांसमोर मांड-

ण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

सर्वसाधारणपणे, इंदिरा गांधीच्या 'राजकीय शैलीवर' भाष्य करणारे बहुतेक पत्रकार वा राजकीय समीक्षक एक महत्वाची गोष्ट दुर्लक्षिताना आढळतात. ती म्हणजे त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्वाचा झालेला (व होत असलेला) विकास. खरं म्हणजे, कोणतेच जिवत व्यक्तिमत्व एखाद्या साच्यात ओतता येत नाही. सतत बदलणाऱ्या परिसरात व्यक्ती घडत असते, तिचे सुप्त असणारे स्वभावविशेष परिस्थितीनुसार खुलत असतात. जितका परिसर बिकट तितका व्यक्तिमत्वाचा ठसा ठळक. कधीकधी परिस्थिती व्यक्तीला गिळूनही टाकते. या परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या व सतत उंचावणाऱ्या लाटांवर जो सहजरीत्या तरु शकतो तो इतिहास टिकतो. बाकी गाडले जातात.

१९६६ साली इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या; किंबहुना सिंडिकेटनेच त्यांचे नाव पुढे केले होते. तेव्हा कोणाला कल्पना होती की, नऊ वर्षांनी ह्या बाई आणीबाणी जाहीर करतील? १९७१ साली बांगला देश युद्धातील विजयानंतर लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या इंदिराराणी १९७७ साली रायबरेलीत ५५,००० मतानी निवडणूक हरतील, अशी कल्पना तरी करणे शक्य होते का? १९७७ साली 'उद्ध्वस्त' झालेल्या इंदिरा गांधी अडीच वर्षात पुन्हा फिनिक्ससारखी झेप घेतील असे किती जणाना वाटले होते?

इंदिरा गांधी हे निश्चित चौकटीत बसणारे चित्रच नाही. एकदा इंदिरा गांधींना एका परदेशी वार्ताहराने विचारले, 'तुमच्याविरुद्ध एवढा सतत आणि तीव्र प्रचार चालू असताना, तुम्ही खंबीरपणे उभ्या कशा?' इंदिरा गांधी उत्तरल्या, 'एखाद्या इमारतीला जर एकदम आग लागली तर वळचणीला लागून बसलेले पक्षी भेदरतात, गुदमरतात, मरून जातात, पण आगीच्या ज्वाळा कितीही उंच गेल्या तरी गरुड मात्र त्याच्यावरून भरारी घेऊन निघून जातो.'

१९६६ साली कोंडीत सांपडलेल्या चिमणीसारखी अवस्था झालेल्या इंदिरा गांधींना, १९६९ नंतर गरुडाच्या भरारीचा अनुभव घेता आला होता. रेल्वेसंपानंतर याच गरुडाच्या पायात लंगर बांधले गेले होते. हे बांधलेले लंगर घेऊन उडता येईना म्हणूनच तर आणीबाणी जाहीर करावी लागली होती. विष्णूने गरुडाला अमृतकुंभातील एक थेंब दिला होता, असे सांगतात. इंदिरा गांधींना हा बेलचीने दिला; पण ज्या पद्धतीने वसंतदादा पाटील, हरिभाऊ वर्तक, वीरेंद्र पाटील परत इंदिरा गांधीभोवती पिंगा घालू लागले आहेत, त्यावरून आता तरी असे वाटते आहे की गरुडाच्या पायात पुन्हा लंगर बांधण्याचा उद्योग मोठ्या जोराने सुरू झाला आहे. ही लंगरं भाडवली हितसंबंधाची आहेत, भाडवली विचारसरणीची आहेत, भरारीला अटकाव करणारी आहेत.

इंदिरा गांधी क्रांतिकारक पुढारी नाहीत; पण त्या लढाऊ खचितच आहेत. त्या स्वैर आणि बेबंद नाहीत; पण बंडखोर निश्चितच आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन याना 'बेताल अन् मार्क्सपणाची बडबड करू नका' असे सुचविणाऱ्या इंदिरा गांधी, शाह आयोगासमोर शपथ घ्यायची नाकारून 'हा आयोग म्हणजे राजकीय सुडाचा प्रवास आहे' असे ठणकावणाऱ्या इंदिरा गांधी आणि चरणसिंगांनी अटक केल्यानंतर 'मी निर्दोष आहे—जामीन काय म्हणून मागू!' म्हणून विचारणाऱ्या इंदिरा गांधी या प्रस्थापित चौकटीत बसवणेही कठीण आहे.

इंदिरा गांधी अनेक वेळा सांगतात की त्यांचा देवावर, ज्योतिषशास्त्रावर विश्वास नाही. पण त्यांच्या हालचालींवर बारकाईने नजर ठेवणारी मंडळी विचारतात, 'मग गळ्यात ही रुद्राक्षाची माळ कशाला? तिरुपतीची भेट कशाला? अन् शंकराचार्यांच्या आशीर्वादाची काय गरज?'

ज्या वैयक्तिक बैठकीतून नेहरूंचा नास्तिकपणा जन्माला आला होता तसा वैचारिक पाया इंदिरा गांधींना नसावा. त्या जेव्हा 'देवावर वा ज्योतिषावर' विश्वास नाही असे म्हणतात तेव्हा ती आधुनिकतेची ओढ असते 'पण मी तिरुपतीला वा तत्सम कोठे जावे अशी माझ्या सहकाऱ्यांची, गावकऱ्यांची इच्छा असेल तर मी तिला मोडता घालीत नाही. मला त्यांच्या भावनांचा आदर करणे हे स्वतःच्या नास्तिकवादाच्या टेंभ्यापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटते, शृंगेरीच्या शंकराचार्यांच्या आश्रमाबाहेर आल्यावर इंदिरा गांधी उत्तरल्या होत्या. चिकमगळूर निवडणुकीच्या वेळेस ही शृंगेरी भेट बरीच गाजली होती. 'आणि मी आशीर्वादच मागायला येते असं तुम्हाला कुणी सांगितलं?' झरीर मसानी या त्यांच्या ख्यातनाम चरित्रकाराला त्या म्हणाल्या. 'मी चर्चमध्ये, मशिदीत, देवळात सगळीकडे जाते. या गोष्टीमध्ये लोकाना हलवण्याचे सामर्थ्य आहे हे मी पाहिले आहे. मला व्यक्तिशः अशा परमेश्वराची काही गरज वाटत नाही; पण त्यात लोकाना हलवून टाकण्यासारखे काय आहे, हेही जाणून घ्यायचे कुतूहल मला असते...आणि अगदी वेगळ्या पातळीवर मला या जागेच्या कलाकुसरीत, · रतीच्या रचनाकौशल्यात रस असतो.'

इंदिरा गांधी जे कृष्णमूर्तींना आवर्जून भेटायला जातात त्यांच्या पुस्तकाच्या कपाटातही कृष्णमूर्तींचे ग्रंथ आहेत; पण कृष्णमूर्ती कोणत्याही धर्माचे, परमेश्वराचे, ग्रंथाचे, सिद्धान्ताचे प्रतिष्ठान मानत नाहीत. पूर्वाश्रमीचे कम्युनिस्ट आणि प्रतिष्ठा साहित्यिक पु. य. देशपांडे कृष्णमूर्तिवादीच आहेत आणि १९४२ चे क्रांतिकारक अच्युतराव पटवर्धनही. कृष्णमूर्तींच्या या अगदी निकटवर्तुळातही असे राजकीय प्रवाह आहेत. अच्युतराव आताही निश्चितपणे इंदिराविरोधी तर पु. य. देशपांडे व फुपुल जयकर इंदिराचे चाहते.

मला व्यक्तिशः इंदिरा गांधींच्या मंदिरात जाण्याने त्यांची आधुनिकता ढळते असे मुळीच वाटत नाही. इंदिरा गांधींच्या अहवालात जर तो पुराणमतवाद प्रगटला असता तर मात्र गोष्ट वेगळी. ही बॉबकट ठेवणारी, पारशी तरुणाशी विवाह करणारी, एक सून इटालीयन अन् एक पंजाबी सून करणारी व्यक्ती खाजगी जीवनात अंधश्रद्धाळू आहे असे मानायला जागा कमी आहे, परंतु पत्रकाराच्या मते मात्र तिचा ज्योतिषांवर विश्वास आहे. माझा एक वेळ ज्योतिषावर विश्वास बसेल पण पत्रकारावर बसणार नाही, इतकेच यावर मी म्हणू शकतो.

इंदिरा गांधींचे राजकीय सामर्थ्य या देव-देवकातून व तांत्रिक-मांत्रिकातून येत नाही. लोकांच्या अव्यक्त, अमूर्त आकांक्षा त्या व्यक्त करतात, मुक्या भावना बोलक्या करतात आणि काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंतच्या शेतमजुराला—ग्रामीण कष्टकऱ्याला सरळ जाऊन भिडतात. त्यात त्यांचे सामर्थ्य आहे.

त्यांना नक्सलवादी 'मूड' समजला याचा अर्थ त्याची विचारसरणी पटली असा नव्हे. त्या बंडखोरी मूडला त्यांनी स्वत.चा आविष्कार दिला आणि काँग्रेस फोडली. फोडून पुन्हा प्रवाही केली, संवादी केली. पुन्हा १९७२ नंतर काँग्रेसचा हत्ती वाळूत अडकला होता–तो १९७७ साली बेलचिलाच मुक्त झाला.

इतर काँग्रेस पुढाऱ्यांना इंदिरा गांधीनी 'पुढे आणले नाही' असा एक थिल्लर प्रचार चालू असतो. नेतृत्व असं दुसऱ्याने 'पुढे आणून' मिळत नसते. समाजातील विविध अंत.प्रवाह आणि अंतर्विरोध ज्याला समजतात, आणि तो समज घेऊन जो क्रियाशील होतो तो पुढारी. जो परिस्थिती बदलायची घोषणा करतो तो नेता. नेहरू आणि इंदिरा गांधी सोडले तर स्वातंत्र्यानंतर देशव्यापी पुढारी कोणीच झाले नाहीत. बाकी सर्व 'काँग्रेसजन'!

## लोकांचा मूड हेरतात

परंतु नेहरू आणि इंदिरा गांधीमध्येही फरक आहे. १९४७ साली पंतप्रधान होण्यापूर्वी नेहरूंनी ३० वर्ष अगोदर चळवळ बांधण्याचे काम केले होते. इंदिरा गांधी चळवळीबरोबर होत्या; पण त्यांनी चळवळ बांधलेली नव्हती. नेहरूंनी काँग्रेसला, समाजवादाचा विचार दिला होता, पंचवार्षिक योजनांची पद्धत स्वीकारायला लावली होती, उदारमतवाद आणि आधुनिकतेचा आशय दिला होता. इंदिरा गांधींनी नेहरूंसारखे वैचारिक नेतृत्व केलेले नाही. त्या चळवळीला खास कार्यक्रमही देत नाहीत. त्या फक्त लोकांचा मूड हेरतात. त्याला आकार देण्याचा प्रयत्न करतात आणि त्यावेळेस त्याना योग्य वाटेल तो कार्यक्रम अंगीकारतात. त्या लोकांबरोबर राहण्याचा आटोकाट प्रयत्न करतात.

लोकांच्या मूडबरोबर राहणे ही विलक्षण कठीण गोष्ट आहे आणि त्या मूडला वळण लावणे त्याहूनही कठीण. महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे पुढारी र. ग. कर्णिक यांना संपावरील कर्मचाऱ्यांच्या मूडचा अचूक वेध १९७८ साली घेता आला नाही, त्यांनी संप मागे घेतल्याची घोषणा केल्याबरोबर शिवाजी पार्कवरील लक्षावधी कर्मचाऱ्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या होत्या, परंतु कर्णिकांचे परिस्थितीचे (संप कोंडीत सापडला होता, निवडणुका तोंडावर आल्या होत्या, राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळत नव्हता) मापन बरोबर असावे. दोन दिवसांनंतर तोच निर्णय ते लोकाना पटवून देऊ शकले.

१९७४ साली देशातील असंतोषाची नाडी जॉर्ज फर्नांडिस यांनी बरोबर हेरली होती. त्या असंतोषाच्या पार्श्वभूमीशिवाय रेल्वे संपाची घोषणा करणे सुद्धा शक्य झाले नसते. १९६७ साली नक्षलवाद्यानी दिलेली 'हमला बोल' घोषणा रेल्वे कामगारांनी सहज उचलली होती. पण जॉर्जला त्या मूडला वळण देता आले नाही, संपाचा विस्तार तो करू शकला नाही. (कदाचित तसा विस्तार झाला तर लढ्याला अस्सल वर्गीय वळण मिळेल आणि नेतृत्व कार्यकर्त्यांच्या गटापर्यंत येऊन पोहोचेल ही भीतीही त्याला असावी). जॉर्जला लढे स्वयम्भू पद्धतीने चालवायची सवय आहे (तसे धोरणही आहे) 'बंद'मध्ये त्याला आपल्या सामर्थ्याचा आविष्कार होत असतो. जितका 'बंद' व्यापक तितके आपले सामर्थ्य. १९६० नंतर जॉर्ज आपले हे सामर्थ्य सतत वाढवीत राहिला. १९७५ च्या आणीबाणीत तो भूमिगत होता. पण जॉर्जच्या आवाहनाला, अभिनिवेषाला मेलोड्रामाचे रंग असतात. 'ये हातकडीयाँ मुझे बांध नही सकती, माँ' असे आतडे पिळवटून, केसांना अफलातून लकब आणीत म्हणणारा अमिताभ बच्चन आणि "आप मुझे जंजीरोंमे बांध सकते है, लेकिन इस देशको नही" हे तितक्याच (वा अधिकही) अभिनिवेषाने उच्चारणारा जॉर्ज हे दोघेही त्याच मेलोड्रामाचे आविष्कार आहेत.

जॉर्जच्या उद्गारांना भगतसिंग–राजगुरूंच्या शब्दाचं वलय तेव्हाही प्राप्त झालं नाही अन् नंतरही नाही. स्वतःची आणि लोकांची फसवणूक इतक्या प्रामाणिकपणे अन् उत्कटतेने अमिताभ आणि जॉर्ज करू शकले म्हणून तर 'शोले', 'दीवार'ला प्रेक्षकाची दाद मिळाली आणि जॉर्ज १९७७ साली साडेतीन लाख मतानी निवडून येऊ शकला! पण 'शो' संपल्यानंतर चेहऱ्यावरचा 'मेकअप' निखळून पडला होता. सध्याच्या राष्ट्रीय रंगमंचावर वेगळ्या मेक-अपची गरज आहे हे जॉर्जच्या लक्षात येऊ लागले असावे. म्हणूनच जॉर्जचे राजकीय नट म्हणून करीयर संपलेले नाही. रेल्वे संपाचे तात्कालिक अपयश हा जॉर्जचा मेलोड्रामा होता. पण कामगार वर्गाची ती 'ग्रेट ट्रॅजेडी' होती. ट्रॅजेडीत सामर्थ्य असतं!

जॉर्ज कार्यक्रम स्वीकारीत नाही, बारकाईने, शिस्तीने संघटना बांधत नाही, त्याच्या अकांडतांडवाला विचारसरणीचा पाया नसतो. पिटातल्या प्रेक्षकांच्या शिट्यांवर जॉर्ज खूष होतो. आपल्या अंगभूत गुणाचा जॉर्ज विकास करतच नाही, तो स्वतःवरच खूष होतो आणि फसतो. जितक्या अपूर्व अभिनिवेषाने लोकसभेत त्याने जनता पक्षाचा पुरस्कार केला, तितक्याच आवेशाने तो दोन दिवसांनंतर जनता पक्षाच्या 'जातीयवादी, पुंजीवादी, संकुचित" दृष्टिकोनावर हल्ला करू लागला होता. 'राम और शाम'मधील दिलीपकुमारलाही लाजवेल असा हा डबल रोल राजकारणात टाळ्या मिळवून देऊ शकत नाही. राजकारण हा लोकांच्या जीवन-मरणाचा संघर्ष आहे. या संघर्षाचे तिकीट काढून ते आलेले नाहीत.

१९७३ पर्यंत अवकाशात भ्रमण करणाऱ्या जयप्रकाशांनी 'संपूर्ण क्रांतीचे' निशाण हाती घेतले होते. त्या निशाणाचा रंग कोणता आहे हे ध्यानी आल्यावर १९७७–७८ नंतर त्या निशाणाभोवती लोक जमेनासे झाले. जयप्रकाश आजारी होते म्हणून परत संघर्षात उतरले नाहीत हे खरे नाही. ज्या दिवशी जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी राजघाटावर शपथ घेतली, तेव्हाच जयप्रकाशांना मनोमनी कळून चुकले असावे की, आपल्या पराभवाला सुरुवात झाली. सतत गहिवरलेला, संभ्रमित, शून्यात पाहणारा चेहरा आणि विचार लोकांच्या मूडचे स्थायी नेतृत्व करू शकणार नाही–शकलाही नाही. 'एका माणसाच्या अश्रू ढाळण्याला रडणं म्हणतात, लाखो लोक रडू लागले की ते आक्रंदन असते.' आक्रंदनात क्रांतीचे सामर्थ्य असते, रडण्यात हतबलता.

आज आपल्या देशात या आक्रंदनानेही पुढच्या पायरीवर आगमन केले आहे.

१९८१ साली पुन्हा जनसंख्यागणना होईल. ७५ ते ८० कोटी इतकी लोकसंख्या तेव्हा असेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. आज दहा वर्षांचा असलेला मुलगा अजून दहा वर्षांनी वीस वर्षांचा अस-

णार आहे. आज तो आईला सागत असेल ' मला भूक लागली आहे' दहा वर्षांनी आई त्याला सांगेल ' मला भूक लागली आहे !' ही भूक ज्याना माहीत असेल, ज्या बेकारीतून ही भूक येते ती बेकारी ज्यांती अनुभवली असेल, ही बेकारी ज्या भाडवलशाही चौकटीतून उद्भवते ती चौकट ज्याना समजली असेल ते ' भूक भूक आरोळी ठोकूनी ' या शासनयंत्रणेचे अजस्र खाब उडवून देणार आहेत.

इंदिरा गांधीना याची पूर्ण जाणीव आहे. ' माणूस ' साठी मुलाखत देताना त्या आम्हाला म्हणाल्या, ' जर आपल्या देशातील लोकशाही व्यवस्था लोकांचे (जीवनमरणाचे) प्रश्न सोडवू शकली नाही तर त्याचा त्या व्यवस्थेवरील विश्वास उडेल आणि रशियामध्ये १९१७ सालच्या रशियन क्रांतीपूर्वी जशी भावना निर्माण झाली तशी इथेही निर्माण होईल. ती भावना कोणती तर 'आपल्याजवळ गमावण्यासारखे आहे तरी काय ? आपल्याला जखडणाऱ्या शृखलांखेरीज ? तेव्हा आपण ही व्यवस्था उधळली तर काय बिघडणार आहे ?' लोकाच्या मानसिक अवस्थेचा वेध इंदिरा गाधींनी अचूक घेतला आहे. पण आज आपल्याला देशातील राजकीय परिस्थिती कशी दिसते आहे ?

## विरोधमय मिश्रण

कार्लमार्क्सने Eighteenth Brumierre मध्ये म्हटल्याप्रमाणे, ' जो काळ आपल्यासमोर आहे तो विलक्षण समिश्र विरोधानी भरलेला आहे. या विरोधमय मिश्रणात आपणास असे घटनावादी दिसतात की जे स्वतःच घटनेविरुद्ध कट करतात. असे क्रातिकारक आढळतात की, जे स्वतःच घटनावादी असल्याचे उघड सांगतात... निर्णयाचा अभाव हाच ज्याचा नियम आहे असे संघर्ष, शाततेचे नाव घेऊन केला जाणारा स्वैर पण पूर्णपणे निःसत्त्व प्रचार, क्रातीचा जप करतच शांततेचा गंभीरपणे केला जाणारा उपदेश, सत्याचा आधार नसताना भावनाचे आकांडतांडव आणि भावनाशून्य सत्यनिवेदन, वीरकर्माशिवाय ' वीर ', घटना न घडवताच इतिहासनिर्मिती कालचक्र फिरते हीच जणू प्रगतीची खूण; तेच ते तणाव व तीव्र विरोध जणू शिगेला पोहोचल्याचे दाखवून त्यांची सोडवणूक न होताच ते विसरून जाणे व संघर्ष न सुटताच आटपणे... जग आता प्रलयाकडे चालले आहे असा तत्त्वशून्य, अर्थशून्य धाक घालीत त्याला वाचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असल्याचा देखावा दिमाखाने दाखवणे...जगाला तारू पाहणारी ही मडळी त्याचवेळी अतिक्षुद्र कारवाया व दरबारी चेष्टिते करण्यात पूर्ण दंग असतात.'

ज्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मंडळींनी येथील न्यायसंस्थेला व संसदीय लोकशाहीला ' भांडवलशाहीची बटीक ' म्हणून संबोधले होते तेच आज न्याय व संसदसंस्थेच्या पावित्र्याचा डंका फिरवीत आहेत. ज्यांनी ' संपूर्ण क्रातीच्या ' नाऱ्यात आपला आवाज मिसळवून दिला होता ते खाजवालात हरिजनांना सळो की पळो करीत आहेत. ज्या जॉर्जसम लोहियावाद्यानी परकीय भाडवलाला मूठमाती द्यायच्या टोलेजंग घोषणा केल्या होत्या त्यानी सर्वाधिक कंत्राट परकीय कंपन्यांना दिली आहेत.

आपण प्रस्थापितविरोधी आहोत असे सागणाऱ्या इंदिरा गांधी पुनः प्रस्थापितात गुरफटू लागल्यासारखे दिसत आहे. कित्येक 'डाव्या' मंडळींना चरणसिंग–चव्हाणामध्ये डाव्या लोकशाही आघाडीचे एक बलस्थान आढळू लागले आहे. शरद पवार तर सर्वांनाच ' आपले ' वाटत आहेत.

हे सर्व लोक जरी पहात असले तरी ते सहज करीत आहेत असे समजणे चुकीचे व फारच धाष्टर्याचे होईल. ' अरे कौन करेंगे–हम करेंगे, ए भाई, कौन लढेंगे–हम लढेंगे ' या घोषणा भिंतीवर येऊ लागल्या आहेत. त्या आदर्शवादी नक्सलवादी तरुणानी रंगवलेल्या नाहीत तर लोकांनीच रंगवलेल्या आहेत.

१९६९ साली इंदिरा गांधींनी असाच मूड आपल्या शिडात भरला होता, पण सुकाणू जर नीट संभाळता आले नाही तर काय होते याचा अनुभव त्याना १९७७ साली आला आहे. १९७४ साली हाच मूड जॉर्जने टिपला होता पण मेक–अप राखता आला नाही तर काय होते हे जॉर्जने १९७९ साली पाहिले आहे.

गेल्या तेरा वर्षांत लोकांची प्रगल्भता विलक्षण वेगाने वाढली आहे. कित्येक पुढाऱ्यांना ह्या प्रगल्भतेची भीती आहे, लोकांचीच भीती आहे. जातीयवाद एकाधिकारशाही, संधीसाधू पक्षांतर वाद अशी अनेक शत्रूची बुजगावणी जरी विविध पक्षानी उभी केली असली तरी लोकाना आपला शत्रू कोण आहे हे कळू लागले आहे.

त्याच्या जाणिवाना चळवळीच्या स्रोतात आणण्याचे सामर्थ्य आज कोणत्याच डाव्या पक्षात नाही. १४ ऑक्टोबर १९५२ रोजी रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या अधिवेशनासमोर बोलताना कॉम्रेड स्तालीन म्हणाले होते, ' पूर्वी भाडवलशाहीने उदारमतवादाची, लोकशाहीची घोषणा करून काही प्रमाणात लोकप्रियता मिळवली होती. आज त्या उदारमतवादाचा कुठे अंशही दिसत नाही. तथाकथित व्यक्तिस्वातंत्र्य आणि नागरिकाचे मूलभूत हक्क हे आहे रे विभागानीच फक्त बळकावले आहे...बाकी सर्व जनता म्हणजे जणू पिळवणुकीसाठी जमा केलेले raw material–(कच्चा माल) सामान्याचे भांडवली लोकशाही हक्क भिरकावून दिले गेले आहेत... बघूनो त्या लोकशाही हक्कांचे निशाण आता आपण हाती घ्यायचे आहे, कम्युनिस्टानी आणि लोकशाहीवर विश्वास असणाऱ्यांनी ते निशाण घेऊन पुढे जायचे आहे. दुसरे कोणीच ते निशाण उचलणार नाही. '

सतीश आळेकराच्या महानिर्वाण नाटकात, खरंच कुणाचे ' महानिर्वाण ' आहे ? कालबाह्य झालेल्या नात्यांचे, निरुपयोगी झालेल्या मूल्यांचे, निखळून पडणाऱ्या सामाजिक संबंधाचे ते महानिर्वाण आहे. पिळवणुकीवर आधारलेल्या भांडवलशाही समाजव्यवस्थेचे ते महानिर्वाण आहे. त्या महानिर्वाणातच उद्याच्या महानिर्माणाचे सामर्थ्य आहे.

एकदा हा महानिर्माणाचा ज्वालामुखी उफाळून आला की जे जळायला पाहिजे ते जळून जाणार आहे. त्या लाव्हारसातच नवीन स्फुल्लिंग आहेत.

□

**(' ग्रंथाली 'तर्फे येत्या १० डिसेंबरला प्रसिद्ध होणाऱ्या लेखकाच्या ' ज्वालामुखीच्या तोंडावर ' या पुस्तकातील शेवटचे प्रकरण, साभार.)**

# निवडणुका

## आता सूत्रे मतदारांकडे

वा. दा. रानडे

जनता पक्ष, काँग्रेस आणि समांतर काँग्रेस याच्यात महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीबाबत समझोता होऊ न शकल्याने अखेर महाराष्ट्रात तिरंगी लढती होणार आहेत. जनता पक्षाने जास्तीत जास्त समझोत्याची तयारी दर्शविली होती. १९७७ च्या निवडणुकीत जिंकलेल्या सोळा जागा लढवून बाकी जागांबाबत समझोत्याची त्याची तयारी होती; पण तिला योग्य प्रतिसाद काँग्रेस व समातर काँग्रेसकडून मिळाला नाही काँग्रेसने तर वाटाघाटीच्या निर्णयाची वाट न पाहताच आपली यादी जाहीरही करून टाकली. समातर काँग्रेसने जनता पक्षाच्या चार जागांची मागणी केली. त्यापैकी दोन जागांचा आग्रह सोडला. पण बाकी दोन जागांबाबत तडजोड होऊ शकली नाही. जनता पक्षाने आता एकूण ४८ पैकी ३० जागा लढविण्याचे ठरविले आहे.

इंदिरा काँग्रेसविरुद्ध एका जागेसाठी एक उमेदवार हे उद्दिष्ट काही आता साध्य होऊ शकत नाही. लोकशाहीवादी शक्तीच्या आपसातील लढतीचा फायदा इंदिरा काँग्रेसला कितपत मिळेल हा या निवडणुकातील मुख्य प्रश्न आहे. तो मिळू द्यावयाचा नाही हा निर्धार आता मतदारानीच आपल्या मनाशी केला पाहिजे. १९७७ चे वातावरण यावेळी नाही हे तर उघडच आहे. पण १९७७ चे कार्य पुरे झालेले नाही. ते पुरे करण्याची संधी जनतापक्षास द्यावयाला हवी. १९७७ मध्ये जनता पक्षास मोठ्या बहुमताने निवडून देऊन मतदारानी आपले कर्तव्य बजावले पण जनता पक्षातल्याच काही नेत्यांना व घटकांना राजघाटावर घेतलेल्या शपथेचा विसर पडला आणि त्यानी पक्ष फोडला. जेथे 'एक दिल' राहिले नाही तेथे 'एकदल कसे टिकणार?' इंदिरा काँग्रेसला तर पुन: सत्तेवर येऊ द्यावयाचे नाहीच पण पक्ष फोडण्याचा गुन्हा करणारानाही मतदारांनीच आता शिक्षा करायला हवी. इंदिरा काँग्रेस आणि हे फूटपाडे या दोघानाही बाजूला सारून जनता पक्षाला त्यानी निर्णायक बहुमताने निवडून आणले पाहिजे. इंदिरा काँग्रेसच्या रूपाने येऊ पाहणाऱ्या हुकूमशाहीला विरोध आणि पक्षद्रोहाला विरोध हेच या निवडणुकीतील मुख्य प्रश्न आहेत. या दोन मुख्य प्रश्नापासून मतदाराचे लक्ष दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न इदिरा काँग्रेस व लोकदलाचे नेते करीत आहेत. इंदिरा काँग्रेसच्या प्रचारतंत्राचा मुख्यभर अफवावर आहे. जगजीवनरामबाबूची प्रतिमा डागळण्याचा पद्धतशीर प्रयत्न त्यांनी चालविला आहे. जगजीवनबाबू अमेरिकेचे हेर होते. बागला देश युद्धाच्या काळात त्यानी अमेरिकेला गुपिते कळविली असा प्रच्छन्न आरोप प्रथम इंदिरा गांधीनी केला आणि चरणसिंगांनीही त्याना साथ दिली. युक्तिवाद संपला की चारित्र्यहननाची अशी हीन पातळी निवडणूक प्रचारात गाठली जाते. जगजीवनबाबूनी या आरोपांचा इन्कार केला असून चौकशीस तयारी दर्शविली आहे. वास्तविक असे आरोप करण्यासाठी इंदिरा गाधीना अमेरिकन पुस्तकाचा आधार तरी कशाला हवा? त्या स्वत च त्या काळात पंतप्रधान होत्या. आपल्या मंत्रिमंडळात अमेरिकेचा हेर आहे हे त्यांना माहीत होते तर हा हेर त्यानी मंत्रिमंडळात राहू कसा दिला? हे प्रकरण आपल्यावरच शेकणार. निवडणूक प्रचाराच्या दृष्टीने आपल्याला त्याचा काही फायदा मिळण्याचा संभव नाही हे दिसून आल्यावर मग हा प्रचार थांबविण्यात आला. पण आता दुसरी एक अफवा फैलावण्यात येत आहे जगजीवन बाबू इदिरा काँग्रेसला मिळणार आहेत ही ती अफवा. या अफवेला आधार निर्माण करण्यासाठी इंदिरा काँग्रेसचे काही नेते जगजीवनबाबूंच्या गाठीभेटी घेतात. एकच खोटी गोष्ट पुन: पुन्हा सांगितली की खरी वाटू लागते, निदान मनात संशय निर्माण होतो. या गोबेल्सच्या प्रचारतंत्राचा अवलंब इंदिरासमर्थक करीत आहेत पण मतदारांची त्यामुळे फसगत होणार नाही. सत्य कोणते, अफवा कोणती यातला फरक आता मतदारानाही समजू लागला आहे. ते अशा प्रचारावर विश्वास ठेवणार नाहीत.

संधिसाधू आयाराम-गयारामाना या निवडणुकीत मतदारांनी धडा शिकविला पाहिजे. हरियाना हे या मंडळीचे आद्यपीठ. ती परंपरा तेथील नेत्यांनी पुढे चालू ठेवली आहे. माजी केंद्रीय मंत्री चांदराम यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. चादराम प्रथम जनता पक्षातून लोकदलात गेले भजनलाल याचे मत्रिमंडळ पाडण्यासाठी चांदरामगटाचा उपयोग करून घेता येईल असा राजनारायण यांचा आडाखा होता. त्यानीच चादराम यांना लोकदलात आणले होते. चादराम याना हरियानाच्या भावी मुख्यमंत्रिपदाचे किंवा केंद्रातील मंत्रिपदाचे आश्वासनही देण्यात आले होते पण भजनलाल मंत्रिमंडळ पाडण्याचा डाव काही साधला नाही. जागा वाटपात आपल्या गटाला अधिक जागा मिळतील ही चादराम यांची अपेक्षाही साध्य होण्याचे चिन्ह दिसेना. चरणसिंगांशी त्याचे मतभेद झाले. लोकदल सोडून इदिरा काँग्रेसला मिळण्याचा विचार चादराम करीत असल्याचा सुगावा चरणसिंगानाही लागला असला पाहिजे. बाल सुब्रह्मण्यम प्रकरणात चादराम याचा हात असल्याच्या सशयावरून सी बी. आय. ने दिल्ली व रोहटक येथील त्याच्या घराच्या झडत्या घेतल्या त्या चरणसिंग यांच्या सूचनेवरूनच झाल्या असल्या पाहिजेत. चांदराम याच्याबरोबर खासदार सुजनसिंग आणि आमदार कॅप्टन मंगरामही इंदिरा काँग्रेसला मिळाले आहेत आणि त्याना पक्षात घेण्यास इंदिरा गाधीनी मान्यता दिली आहे असे इदिरा काँग्रेसच्या मुख्यकचेरीने एका पत्रकात म्हटले आहे दोन महिन्यात दोन वेळा ज्याने पक्ष बदलला त्या चादरामना निवडून द्यावयाचे नाही असाच निर्धार तेथील मतदार करतील यात शका नाही.

मताचा हक्क हा लोकशाहीत मतदाराच्या हाती असलेले प्रभावी शस्त्रच आहे. राजकीय परिस्थिती गोंधळाची आहे आणि त्याला राजकीय नेतेच जबाबदार आहेत. या गोंधळास जबाबदार असणाऱ्या राजकीय नेत्याना धडा शिकविण्यासाठी निवडणुकीची सूत्रे राजकीय नेत्याकडून आता मतदारांनीच स्वत कडे घेतली पाहिजेत. हा गोंधळ निर्माण करून तुम्ही काय साधलेत हा सवाल त्यांनी गोंधळास जबाबदार असलेल्या नेत्यांना विचारला पाहिजे आणि पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी जनता पक्षाला निर्णायक बहुमताने सत्तेवर आणले पाहिजे. अर्थात जनता पक्षानेही आपल्या चुका सुधारल्या पाहिजेत ही मतदाराची अपेक्षा आहे ☐

## अमेरिकेहून सौ. माधुरी बापट लिहितात....

# निवडणुकांच्या निमित्ताने : इथल्या व तिथल्या

निवडणुका आल्या की सगळं सामाजिक-राजकीय वातावरण कस लगीनघाईन भरून जात. जागोजाग ' XXX लाच मते द्या ' चे बोर्ड, पताका, घोषणा, मिरवणुका, पहाटेपर्यंत चालणारी नेत्याची भाषणे. एरवी संसारात रमणारा सर्वसामान्य माणूसही सर्व काही विसरून आवडत्या-नावडत्या नेत्याविषयी-पक्षाविषयी लब्याचौडया गप्पा हाणत असतो. मग लेखक-कवी-नट-नटचा यानाही त्याची बाधा झाल्यास नवल नाही.

परंतु एकदा का त्या निवडणुकाचे सूप वाजले व सर्व काही शांत शात झाले की सर्वसामान्य माणूस सर्व काही विसरून संसारात रमून जातो मग रोजचे तेच ते प्रश्न सोडवणे चालू राहते, आज काय हे महाग झालं, उद्या काय ते मिळेनासं झालं, इ. इ.

अमेरिकेत येईपर्यंत मी पण अशीच होते. कधीतरी येणाऱ्या निवडणुका सोडल्या तर राजकारणाशी माझा तसा फारसा संबंध नसे, म्हणजे त्यातले फारसे काही कळतच नसे. खरं सागायच तर त्या राजकारणाच्या बुजबुजाटात कधी लक्ष घालाव असं मनच होत नसे. मग ते कळणार कसं ? ही परिस्थिती आपल्या देशातल्या राजकारणाविषयी, तर जगाचे काय हाका मारायला कळणार ? ' मिडल ईस्ट ' काय प्रकरण आहे, कार्टर-सादत-बेगीन का भेटत असतात, ' सॉल्ट ' ही काय भानगड आहे; हे केवळ इकडे आले म्हणूनच कळू लागले.

त्यात आता इथेही पुढल्या वर्षी होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकाचे वारे वाहू लागले आहेत. तेव्हा साहजिकच माझं चौकस मन इथल्या वातावरणाची आपल्या तिकडच्या वातावरणाशी तुलना करू लागलं. आणि काय आश्चर्य ! आपल्या तिकडच्या निवडणुका नि इथल्या; त्याचं वातावरण अगदी तेच ! भारतात असताना उगीचच मला वाटत असे की अमेरिकेत घोषणा, मिरवणुका, जोरजोरात मुठी आपटत होणारी भाषणे हे काही नसतंच. सगळं काही सुरळीत, शांतच असतं. पण ह्या कल्पनेला मोठाच तडा गेला. शेवटी माणूस हा इकडून तिकडून सारखाच हो !

निवडणुका आल्याने पुढाऱ्यांची ती पोकळ आश्वासने देणे, विरुद्ध पक्षातील लोकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणे, ह्याला इथेही अगदी ऊत आला आहे. सत्तारुढ पक्षाच्या चुकाचे भाडवल करून इतर पक्ष आपलीच बाजू कशी बरोबर हे जनतेपुढे माडत आहेत. तर सध्याचे देशापुढील ज्वलंत प्रश्न कसे खुबीने सोडवू, ह्याची मीमासा दोन्ही पक्षातील होतकरू उमेदवार करीत आहेत.

आपल्या तिकडे महागाई, बेकारी, गरिबी, वाढती लोकसंख्या अशा ज्वलत प्रश्नांवर ' गरिबी हटाव 'सारखी योजना काढून इंदिराबाई सभा गाजवत असताना गुजरातमध्ये म्हणतात, ' मैं गुजरात की बहू हूँ ! ' तामिळनाडूत म्हणतात, ' मैं तिरुपती की भक्त हूँ ! ' जनता जनार्दनाचा कौल आपल्याच बाजूने लागावा म्हणून सगळे अशा वेळी ' मी नोकर बादशहाचा 'प्रमाणे वर्तन करत असतात.

त्याला इथले पुढारी पण अपवाद नाहीत. शेतकऱ्यांपुढे बोलताना कार्टर म्हणतो, ' मी पण एक शेतकरीच आहे ' तेव्हा विरोधी पक्षातल्या लोकाचे टोमणे बसतात, ' व्हाइट हाऊसला बसणं म्हणजे जॉर्जियात भुईमूग पिकवणं नाही महाराज ! ' आणि तोच सुशिक्षित लोकापुढे म्हणतो, ' मी पण न्यूक्लिअर इंजिनियर आहे ' परंतु आता अमेरिकेतल्या थोड्याफार न्यूक्लिअर प्लँटस्‌चाही बट्ट्याबोळ वाजू लागल्याने ही युक्ती विशेष लागू पडेलसं वाटत नाही. परंतु त्याचा धार्मिक स्वभाव, चारित्र्य व ' येशू माझ्या स्वप्नात येऊन संदेश देतो ' वगैरे सुपरस्टिशियस स्टट, इथल्या काही धर्मवेड्या जनतेला काबीज करायला पुरेसे आहे.

बाकी सौ. रोझलीन कार्टरबाईना आपण मानले. अशी आधुनिक जगातली ' सीतामाई ' अमेरिकेत अवतरली ह्यावर विश्वास बसत नाही. कार्टरचा सर्वांत जास्त डंका कोण पिटवत असेल तर तीच !

तेव्हा सध्या सत्तेवर असलेल्या अध्यक्षांना आता कोणत्या प्रतिस्पर्ध्याशी रिंगणात दोन हात करावे लागणार आहेत, हे महत्त्वाचे आहे.

७६ साली कार्टर निवडून आला, ते म्हणे निव्वळ योगायोगाने ! निक्सनच्या वॉटरगेट प्रकरणाने रिपब्लिकन पक्षाचा कणाच मोडल्यासारखे झाले व मुळात जो पॉलिटिशियनच नाही अशा बिचाऱ्या फोर्डवर निवडणूक लढविण्याची पाळी आली नि त्यामुळे डेमॉक्रॅटिक पक्षाची सरशी झाली.

### सद्य:परिस्थिती

सध्या अमेरिकेतली परिस्थिती मोठी क्रिटिकल आहे. तशी म्हणे बरोबर पन्नास वर्षांपूर्वी पण होती. वाढती महागाई, बेकारी, व्हिएटनाममधून येणारे रेफ्यूजी, पेट्रोलसाठी मिडलईस्ट बरोबरचे ठेवावे लागणारे संबंध, एनर्जी क्रायसेस हे सध्याचे इथले ज्वलंत प्रश्न ! एकूण काय अमेरिकेच्या श्रीमंतीला ओहोटी लागल्याची चिन्हं दिसत आहेत. एकेकाळी कोकच्या बाटल्या पण फेकून देणारी लोकं आता त्याच्या कॅन्सपण रीसायकल करू लागली आहेत. थोडेच दिवसात ही वेळ वर्तमानपत्राची रद्दी व प्लास्टिकच्या पिशव्यावर आली तर नवल नाही.

शेवटी सर्व जगात वाढती लोकसंख्या व अन्नतुटवडा हे प्रश्न

भेडसावत असताना असा एकच देश किती दिवस अशा श्रीमंतीत राहू शकणार आहे ? ह्या संदर्भात पूर्वी इथे जे. एफ्. केनेडी अध्यक्ष असताना रशियाचे ख्रुश्योव यांनी काढलेले उद्गार मोठे मार्मिक वाटतात. इथली अन्नसाठ्याने तुडुंब भरलेली कोठारे पाहून ख्रुश्योव पण हरखला होता, स्तिमित झाला होता. परंतु इथल्या माणसागणिक असलेल्या मोटारी पाहून व एकटा माणूस आठ-आठ जणांसाठी असलेली गाडी वापरतोय, ते पाहून म्हणाला, 'ही कसली श्रीमंती ! हा मूर्खपणा आहे. जगातले १/३ पेट्रोल एकटी अमेरिका किती दिवस वापरू शकेल ?' आणि हे खरंय ! बाहेरच्या जगात गॅलनला दोन-अडीच डॉलर पडतात तेव्हा एकटा अमेरिकनच अर्ध्या डॉलरला एक गॅलन किती दिवस खरेदी करू शकेल ? ह्या पेट्रोलच्या टचाईने इथली कार-इंडस्ट्री पण धोक्यात येऊ लागली आहे. तरी पण अमेरिकन माणसाचे कार-प्रेम काही संपत नाहीये. म्हणूनच Exxon Sohio सारख्या कंपन्या दीडशे, दोनशे टक्के नफा करून घेत आहेत.

## कोण जिंकेल ?

गरीब माणसाला यंदाचे हिवाळ्यातील Heating Bill भरणे जड जाणार आहे. न्यूक्लिअर पॉवर वाटली होती तेवढी स्वस्त नाहीये. ५० सालच्या सुमारास जेव्हा अगदी सुरुवात होती तेव्हा लोकांना वाटले होते, की ह्या न्यूक्लिअर पॉवरने वीज एवढी स्वस्त होईल की मीटर्स बसवायची आवश्यकता वाटणार नाही. पण प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. दिवसेंदिवस वीज महागच होत आहे. शिवाय नुकत्याच झालेल्या 'थ्री माईल आयलंड'च्या अपघातामुळे तर जनतेची न्यूक्लिअर पॉवरवरील श्रद्धा ढासळत चालली आहे. त्याला 'अंडर ग्राउंड टेस्ट्स' मुळे वाढणारे कॅन्सरचे प्रमाणही कारणीभूत आहे. शेवटी न्यूक्लिअर पॉवरलाही कुठे तरी मर्यादा आलेली आहे नि शास्त्रज्ञ आता सोलर एनर्जीच्या मागे हात धुऊन लागले आहेत.

अर्थात सध्याच्या क्राइसेसचे मूळ हे पूर्वीच्या ह्याच्या प्रोजेक्ट्समध्ये दडलेले आहे. लाडक्या नेत्याच्या-JKA-घोषणेनुसार चंद्रावर माणूस पाठवायचा पराक्रम केला खरा परंतु त्यामागचे इप्सित साध्य न झाल्याने मोठीच निराशा झाली. उलट सर्व मोठाले स्पेस प्रोग्रॅम्स धडाधड कॅन्सल झाल्याने गणितज्ञ, शास्त्रज्ञांना धडाधड नोकरीवरून काढण्यात आले व देशात एक 'ओव्हर क्लालिफाइड अंडर एम्प्लॉइड' असा वर्ग निर्माण झाला. कित्येकाच्या तर मनावर परिणाम झाला.

त्यातच व्हिएटनामच्या युद्धात पडल्याने त्याची शिक्षाही आता भोगावी लागत आहे. तिथून बोटी भरभरून येणाऱ्या रेफ्यूजीना पोसावे लागत आहे. म्हणतात तसं-संकटं येतात ती हत्तीचं रूप घेऊन-सध्या अमेरिकेवर सर्व बाजूनी अशी संकटं कोसळत आहेत.

तेव्हा अशा परिस्थितीत जो चांगलं नेतृत्व करेल त्यालाच चांगले चान्सेस आहेत म्हणायचे. इतके दिवस टेक्नॉलॉजी वर्थ कंट्रोलच्या जोरावर जगातील नंबर एकचा देश म्हणून मान उंच राहिली आहे. ती भविष्यात पण कोण टिकवून धरेल याला महत्त्व आहे. 'भिकारी' हा शब्द अमेरिकेच्या शब्दकोशात नाही, ही गोष्ट किती दिवस सत्य राहील हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

त्यादृष्टीने नुकताच लागलेला कार्टर विरुद्ध केनेडी हा जनमताचा फ्लोरिडातील कौल मोठा मनोरंजक आहे. नेतृत्व, लोकप्रियता यामध्ये एडवर्ड केनेडीचे वर्चस्व आहे तर चारित्र्य, धार्मिकता यामुळे कार्टर वरचढ वाटतो. सेनेटर एडवर्ड केनेडींना इतिहासप्रसिद्ध वडील बंधूमुळे एक प्रकारचे ग्लॅमर आहे. जोडीला व्यक्तिमत्त्व पण आहेच. परंतु त्याचबरोबर 'चॅपक्वाडिक' प्रकरणामुळे चारित्र्यावर लागलेला ठपकाही निर्विवाद आहे. परंतु असे असतानाही त्यानी मांडलेला 'हेल्थ प्लॅन' जनतेला आकर्षित करीत आहे. अमेरिकेतील डॉक्टर्सची मोनापली व जनतेची त्याच्याकडून होणारी पिळवणूक ही गोष्ट आता सर्वश्रुत आहे. तेव्हा सामान्य जनतेला विशिष्ट मर्यादेपलीकडे डॉक्टरवर खर्च करावा लागू नये ही त्यामागची मूळ कल्पना !

हे दोघे रथी महारथी निवडणूक लढवितानाच, तिसरा एक डेमॉक्रॅटिक उमेदवार कॅलिफोर्नियाचा गव्हर्नर जेरी ब्राऊन पण अध्यक्ष होण्याच्या आशा बाळगून आहे. त्याचे लढण्याचे शस्त्र वेगळे आहे. त्याने न्यूक्लिअर पॉवर विरुद्ध मोर्चे बांधले असून सोलर एनर्जीचा पाठपुरावा चालू केला आहे. त्यासाठी त्याचे सहकारी झटत आहेत. टॉम हेडन्नी जोन फोंडा ही पति-पत्नी जोडी सभा गाजवीत आहेत. ह्या जोरावर टॉम हेडन ही सेनेटर म्हणून निवडून येण्याची आशा बाळगून आहे.

जेन फोंडा ही हॉलिवूडची प्रसिद्ध नटी-प्रसिद्ध नट हेन्री फोंडा याची कन्या, सिनेजगातल्या आपल्या करीअरबरोबरच किंचित पॉलिटिशियन होऊ पाहात आहे. तिच्या व्हिएटनामच्या भेटीमुळे व त्यावर आधारित काढलेल्या ऑस्कर ॲवॉर्डेड 'कमिंग होम' ह्या पिक्चरमुळे, तसेच 'थ्री माईल आयलंड'च्या अपघाताआधी तशाच प्रकारच्या अपघातावर आधारित काढलेल्या 'चायना सिन्ड्रोम' ह्या पिक्चरमुळे विशेषतः विद्यार्थी वर्गात तिची लोकप्रियता वाढली आहे. ती तिच्या नवऱ्याला व जेरी ब्राऊनलाही बरीच उपयोगी पडेल असं वाटतं.

डेमॉक्रॅटिक पक्षाचा हा सीन तर रिपब्लिकन्सही स्पर्धेमध्ये मागे नाहीत, सेनेटर बेकर, पूर्वीचे सी. आय. ए. डिरेक्टर जॉर्ज बुश व गव्हर्नर कॉनेली ह्याच्यात अध्यक्षीय निवडणुकीसाठी चढाओढ चालू आहेच. सध्यातरी तिघामध्ये बेकरच प्रबळ वाटतो.

## आपण काय शिकावं ?

तसा आपल्या तिकडच्या व इथल्या राजकारणात व निवडणूक पद्धतीत फरक आहेच. दोन्ही देशात लोकशाही तर आहेच, पण इथली अध्यक्षीय लोकशाही पुष्कळ बाबतीत आपल्या तिकडच्यापेक्षा प्रबळ वाटते. एक मोठा फरक म्हणजे इथे कम्युनिझमचे नावही नाही. कम्युनिस्ट असणे हाच इथे गुन्हा आहे. 'मग कसली ही लोकशाही' असं कम्युनिस्ट म्हणतात. परंतु कम्युनिझम हा लोकशाहीचा सरळ सरळ शत्रूच, मग त्याला कसं बरं पोसायचं ? तेव्हा इथे फक्त दोनच प्रबळ पक्ष ! एक डेमॉक्रॅटिक नि दुसरा रिपब्लिकन ! पोत्याने पक्ष असण्यापेक्षा खरोखर एकमेकाला चांगले प्रतिस्पर्धी असणारे पक्ष देशाचे राजकारण उत्तम तऱ्हेने सांभाळू शकतात. हे आपल्या तिकडच्या राजकारणी लोकाना समजलं नसेल का ?

मला आठवतं जनता पक्ष सत्तेवर आल्यावर काँग्रेस श्रेष्ठींना दुसरा चागला विरोधीपक्ष म्हणून काँग्रेस वाढवायला चांगली संधी होती. एवीतेवी बरेच बारके बारके पक्ष जनता पक्षात विलिन झालेच होते. परंतु हे काही त्यावेळी बिचाऱ्या काँग्रेस श्रेष्ठींना जमले नाही. आत्ताच्या निवडणुकीच्या निमित्ताने तेवढे तरी होईल असं वाटतं. नाहीतर कधी जन्मात विरोधी म्हणवून घ्यायचीच सवय नाही हो !

इथे प्रत्येक शहरासाठी मेयर, प्रत्येक प्रातासाठी गव्हर्नर निवडले जातात. तसंच आपल्या तिकडच्या खासदारांप्रमाणे इथे 'सेनेटर' निवडले जातात. ह्या सेनेटर्समधूनच व इतर तज्ज्ञाचा समावेश होऊन अध्यक्ष स्वत:चे मंत्रिमंडळ बनवतो. इथे मंत्री ह्याला 'secretery' हा शब्द वापरतात. हे सेक्रेटरी त्या त्या खात्याचा प्रमुख म्हणून काम करतात तेव्हा त्यांचा त्या विषयातील सखोल अभ्यास असतो. म्हणजे आपल्या मंत्र्यासारखे नुसते सहयाजीराव नव्हेत हो !

अध्यक्षीय निवडणुका सुद्धा अगदी पद्धतशीर होतात. तुलाच का तिकिट मला का नाही, ही रुसवा फुगवी नाही. हिंमत असेल त्याने 'उभे राहावे' कारण प्रथम दोन्ही पक्षांमध्येच इच्छुक उमेदवारांमध्ये निवडून येणारा अध्यक्षीय निवडणुकीसाठी पात्र ठरतो व शेवटी सर्वांत जास्त मते मिळवणारे दोन्ही पक्षातील एक एक उमेदवार शिल्लक राहतात. त्याच्यात शेवटी खरी निवडणूक होते. सध्या अशा दोन्ही पक्षातील उमेदवार निवडण्यासाठी वेगवेगळया प्रातात मतदान चालू आहे. परंतु शेवटपर्यंत कोण टिकेल ही उत्सुकता आहेच.

इथली दुसरी एक पद्धत मला अतिशय प्रभावी व उल्लेखनीय वाटली. तिकडे काय आणि इकडे काय, पुढारी म्हटला की ढिगानं आश्वासन, हे ओघानंच आल. परंतु इथे उमेदवाराला स्वत:ची पात्रता सदाखल पटवावी लागते. न्यूज मिडिया, प्रेस कॉन्फरन्स मध्ये दोन्ही पक्षातील उमेदवाराना बोलावून टी. व्ही. वर सर्व जनतेसमोर स्वत:च्या योजना, राजकारण, अर्थकारण सारख्या विषयांतले स्वत:चे ज्ञान व गती ही संबंधित तज्ज्ञाच्या प्रश्नाना समाधानकारक उत्तरे देऊन पटवावी लागते. सध्याच्या ज्वलंत प्रश्नांवर करावे लागणारे उपाय, तोडगे यांची मीमासा करावी लागते. यातून जो जास्त पात्र ठरेल त्याच्याकडे जनमताचा कौल लागण्याची शक्यता अर्थातच जास्त असते.

विरोधी पक्षालाही टी. व्ही. वर प्रसारासाठी संधी देणे ही खरी लोकशाही नाही का ? मला आठवतं आपल्या तिकडेसुद्धा जनतापक्ष सत्तारूढ झाल्यावर टी. व्ही. नभोवाणी मंत्री लालकृष्ण अडवाणी यानी काँग्रेसश्रेष्ठींना तशी संधी दिली होती. ही गोष्ट अतिशय स्तुत्य आहे. परंतु त्याचा योग्य फायदा सबंधितानी घेतला का, हा प्रश्न आहे.

इथल्या न्यूज मिडियावर कसलेही बंधन नाही. सर्व जगातल्या वित्तंबातम्या तंतोतंत क्षणार्धात काढण्याची त्यांची कुवत पाहून आश्चर्यानं थक्क व्हायला होतं. एखाद्या गोष्टीसाठी वार्ताहर जेव्हा जिवाची पर्वा न करता हात धुऊन मागे लागतात तेव्हा नवल वाटते. विशेषत: चारित्र्य, चुकवलेले टॅक्सेस, वॉटरगेट, थ्री माईल आयलंड-सारख्या घटना—इतक्या कुशलतेनं त्याचे इन्व्हेस्टिगेशन करतात की संबंधितांना पळता भुई थोडी होते. म्हणजे अप्रत्यक्षपणे जनतेच्याच पुढाऱ्यांवर, जबाबदार लोकावर नियंत्रण म्हणा ना !

ह्या गोष्टीमुळेच इथले राजकारण जास्तीत जास्त यशस्वी होत गेले व देशाचा सर्वच बाबतीत असा विकास झपाट्याने होत गेला. वर्तमानपत्रावर, टी. व्ही., रेडियोवर नियंत्रणे आणली तर ती कसली लोकशाही नि मग कसले ते सुदृढ राजकारण !

अर्थात् आपल्या देशातले प्रश्न वेगळे आहेत. परंतु खरी लोकशाही टिकवायची असेल व देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल तर योग्य नेते, सुदृढ राजकारण, प्रवळ, अनियंत्रित वृत्तपत्रे, रेडियो व भारंभार पक्षाऐवजी दोन-तीनच प्रबळपक्ष याची खरी गरज आहे, असं वाटतं. आणि हे आपल्या तिकडच्या राजकारणी लोकांना लौकरच उमजावं अशी इच्छा आहे.

परंतु उलट लागोपाठ दोन पंतप्रधानाचा राजीनामा, नेहरूपुत्री निवडून येणे, एकूणच राजकारणाचा बट्ट्याबोळ, तशातच जयप्रकाशजीचे निधन अशा कटु बातम्यांनी परदेशी देशप्रेमी भारतीयांचे मन कुठेतरी दु:खी बनले आहे. त्यात इथली न्यूज मिडिया एकूणच गरीबदेश म्हणून वाईट तेवढया बातम्यांचा डंका पिटवून जास्तच हसं करीत असते.

खरं म्हणजे आज आशियातील विकसणाऱ्या देशांमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वांत मोठा लोकशाही देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. आपल्याच देशात असताना आपल्याच देशाबद्दल बाहेरच्या जगाला काय वाटतं, आपल्या देशाची 'इमेज' कशी आहे ते कळत नाही गरीब देश असूनही आज न्यूक्लिअर टेस्ट करणाऱ्याच्या पक्तीत आपण आहोत, जगातील दुसऱ्या टेस्ट टयूब बेबीलाही भारतीय डॉक्टरांनीच जन्म दिला आहे. अमेरिकन मार्केटमध्ये तर Made in India माल पाहून अनेक लोक आश्चर्यानं तोंडात बोट घालत असतात. प्रतिकूल परिस्थितीतही केलेला विकास हा खरोखर स्तुत्य आहे. चांगले नेते लाभले तर आपल्या देशाची भरकटणारी नाव नक्कीच उन्नतीच्या किनाऱ्याला लागेल यात शंका नाही.

तेव्हा तात्पर्य असं की, येत्या निवडणुकीत काय घडते आहे याकडे परदेशातीलही भारतीयांचे उत्सुक डोळे लागले असतील तर त्यात नवल नाही. □


**मान्यता पावलेला चरित्रग्रंथ**

# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

# बगाड (१)

# सगळं कसं एकसुरी



बघ्या

माझे ज्येष्ठ मित्र चाफाजीराव पाटील यांचा माझ्यावर मुलासारखा लोभ. त्यामुळे काहीही महत्त्वाची गोष्ट करायची झाली की, मला बरोबर घेतल्याखेरीज ते रहात नाहीत. परवा असेच झाले. सोलापूर लोकसभेचे इंदिरा कॉंग्रेसचे तिकीट मिळावे याची खटपट करण्यासाठी त्यांना दिल्लीला जायचे होते. मला त्यांनी अगदी ओढून नेले. आम्ही दोघेही झेलम एक्स्प्रेसने दिल्लीला गेलो. उतरायचे कुठे हा प्रश्नच नव्हता. विठ्ठलरावजी गाडगीळ यांची कोठी चाफाजीरावांसाठी सदा उघडीच असते.

पण मागच्या खेपेला चाफाजीरावांविषयी बोलताना तुम्ही म्हणाला होता की, त्यांचा मुलगा बबन्या याला विधानसभेसाठी जनता पार्टीचे तिकीट मिळावे अशी ते खटपट करीत होते, म्हणून. आता स्वतः चाफाजीरावांना वाशिंगवळ कुठून आले? आणि त्यातून एकदम इंदिरा कॉंग्रेसचं तिकीट?

आठवतंय् की तुम्हाला सगळं. आता विधानसभेसाठी चाफाजीरावांनी बबन्याला जनता पार्टीतर्फे उभे केले होते ही गोष्ट खरी. अब्दुल रहिमान अंतुले साहेबांनी नेमका हाच पॉइंट काढला चाफाजीरावांविरुद्ध. बाईंजवळ माणसे मोठी बेरकी. चित्रगुप्ताजवळसुद्धा नसेल असा प्रत्येकाच्या चरित्राचा झाडा त्यांच्याजवळ तयार!

मग काय उत्तर दिले चाफाजींनी?

उत्तर काय द्यायचे. चाफाजींसारख्यांना पार्टी म्हणजे उगा आपली सोय असते. जिकडून निवडून येता येईल ती त्यांची पार्टी; आणि ते जिकडून उभे राहतील त्या पार्टीला जास्त चान्स! असा सगळा तिढा असतो बघा. त्यांच्या लेखी जनता काय, चव्हाण कॉंग्रेस काय अन् इंदिरा कॉंग्रेस काय. सगळे ताटांतले वाटीत अन् वाटीतले ताटात अशी स्थिती असते.

हेच सांगितले चाफाजींनी अंतुल्यांना?

नाही हो. असे खरे कसे सांगतील? पण उत्तर काही दिले तरी पक्का अर्थ मघा सांगितलेलाच. अंतुल्यांपुढे मला हात जोडून चाफाजीराव उभे राहिले अन् खाली मान घालून म्हणाले, 'चुकी झाली साहेब पदरात घेतले पाहिजे.'

मग मिळाले का तिकीट?

तीच तर मोठी भानगड आहे. आम्ही विठ्ठलरावांकडे पोचलो असे रात्रीचे. त्यावेळी विठ्ठलराव बाईंच्या कोठीवर गेले होते. कमलापति त्रिपाठीजी, स्टीफनसाहेब, अंतुलेसाहेब, वसंतराव साठे वगैरे मंडळीही तेव्हा बाईंच्या कोठीवरच होती. बहुगुणांशी वाटाघाटी चालल्या होत्या ना. आम्ही विठ्ठलरावांची वाट पहात चांगले तीनपर्यंत जागे होतो. तीन वाजता बॅरिस्टरसाहेब आले. चाफाजीरावांना दंडवत घातला.

काय?

मग! चाफाजीराव म्हणजे काकासाहेबांच्या वेळेपासून कॉंग्रेसचे कार्यकर्ते. विठ्ठलराव फार मानतात त्यांना. शिवाय दिल्लीकर राजकारणी मंडळींना दंडवतांचे काही विशेष वाटत नाही. न घातला तर मात्र ती बातमी होते. आपल्या मधू दंडवत्यांना यशस्वी मंत्री का म्हणतात? अहो, नावातच दंडवत त्यांच्या!

बरे, पुढे काय झाले?

गाडगीळसाहेब म्हणाले, 'माफी करा, चाफाजीराव'

माफी मागण्याची त्यांची सवय माफी–फोरमच्या काळापासूनचीच आहे!

मलाही पहिल्यांदा तसेच वाटले. पण पुढे ते म्हणाले 'आता अगदी थकलो आहे. उद्या सकाळी मला खूप वेळ आहे. तेव्हा बोलू सावकाशीत.' चाफाजीरावांनी पाठवान थोपटलं विठ्ठलरावांचे, 'निजा' आता असे पुटपुटले आणि आम्हीही झोपायला गेलो. सकाळी चांगलाच गारठा होता. मला अशी ६ वाजताच जाग आली. शाल पांघरून गॅलरीत उभा राहिलो, तो काय गंमत! विठ्ठलराव ओव्हरकोट पेहनून कसले तरी स्तोत्र म्हणत येरझारा घालतायत. माझ्याकडे लक्ष जाताच त्यांनी 'बोलू नका' असे खुणावले मला. मग स्तोत्र संपल्यावर मला खांद्यावर हात ठेवून त्यांनी डायनिंग टेबलावर चहासाठी बसवलं.

पण स्तोत्र कसले म्हणत होते?

ऐका हो. विठ्ठलराव म्हणजे मोठा सश्रद्ध माणूस. राज्यसभेचे तिकीट मिळाले तेव्हा तळ्यातल्या गणपतीला त्यांनी एक हजार रुपयांची देणगी दिली. इंदिराबाईवरही त्यांची अलोट श्रद्धा. 'माताजी' या शब्दाखेरीज ते बाईंचा उल्लेख करीत नाहीत. तर काय झाले, की बाईंची विंध्यवासिनीवरची भक्ती जाहीरच आहे. विंध्यवासिनीच्या पुजाऱ्यालाही बाईविषयी फार आपुलकी. त्या पुजाऱ्याने विंध्यवासिनीच्या स्तवनाच्या धर्तीवरच हे इंदिरा स्तोत्र रचले आहे. त्याचे मराठी भाषांतर बॅरिस्टर साहेबांनी केले. ओवीबद्ध पहिलीच ओवी आहे. 'ॐ नमोजी इंदिरा! तुझा त्रिखंडी दरारा। गरिबीच्या अजगरा। नाशिले तुवा॥' थोडी डागडुजी केली तर राष्ट्रगीत होण्याच्या लायकीचे हे स्तोत्र आहे, असे विठ्ठलराव म्हणाले.

बापरे, म्हणजे कॉंग्रेस (आय्) राज्यावर आली, तर राष्ट्रगीत बदलणार म्हणायचे.

तसेच काही नाही. विठ्ठलरावांचे काय झालेय्, की संघाची प्रार्थना राष्ट्रगीताच्या बरोबरीची समजली जावी असा सरकारी हुकूम काढण्याचा जनसंघाचा कावा होता, असे त्यांच्या मनाने घेतलेय्. तेव्हापासून राष्ट्रगीताला निरनिराळे पर्याय ते शोधत असतात. सध्या इंदिरा–स्तोत्रावर ते खूष आहेत, इतकेच. आणखी काय म्हणाले बॅरिस्टरसाहेब?

नंतर एक जंगी व्याख्यान झोडले त्यांनी माझ्यापुढे. त्यांचे म्हणणे असे की, आपण शहरी पांढरपेशी माणसे स्वतःला लोकशाहीचे

ठेकेदार मानतो. त्यामुळे कायम लोकशाही धोक्यात आहे, असा बागुलबुवा आपल्याला भेडसावीत राहतो. लोकशाही आणि व्यक्ति-स्वातंत्र्य याच्या परदेशी आणि पुस्तकी कल्पनाच्या मागे लागल्याने हुकूमशाही आणि खवीर लोकशाहीनेतृत्व यात फरक करण्याची शक्ती मध्यमवर्गीयांनी गमावली आहे. आणीबाणी हा एक तर अपवादच होता आणि त्या अपवादात्मक परिस्थितीत बाईंनी लोकशाहीची कास सोडली नव्हती. तेव्हा बाई एकाधिकारशाही आणणार आहेत या म्हणण्यात काही तथ्य नाही. बरे, सध्या परिस्थिती अशी आहे की, खंवीर नेतृत्वाशिवाय येथे स्थिर सरकार येणार नाही किंवा देशाचे ऐक्यही टिकणार नाही. असे नेतृत्व बाईंखेरीज कोणाकडे आहे? तेव्हा इंदिरा गांधींना पर्याय नाही. इतकेही करून इंदिरा गांधींना शहरवासियांनी विरोध केला, तरी तो यशस्वी होणार आहे का? बाईंनी हरिजन–गिरिजन आणि अल्पसंख्याक तसेच शहरातील झोपडपट्टीवाले आणि गोरगरीब यांची मते जिंकली आहेत. विरोध आहे तो मधल्या शेतकरी जाती आणि नागरी उच्चवर्गीय याचा. हे दोन गटही परस्पर-विरोधी झालेत. तेव्हा बाईंना सत्तेपासून कोणी रोखू शकत नाही, तरी शहरी पांढरपेशांनी जनसंघीयाच्या नादाला लागून बाईंना चालवलेला विरोध सोडून दिला पाहिजे.

अरे, पण शहरी पांढरपेशाची मते तुमच्या दृष्टीने इतकी तुच्छ असतील तर विठ्ठलरावाना पुण्यात उभे करण्याचा खटाटोप तरी कशाला पाहिजे? आणि दक्षिण मुंबईच्या उच्चभ्रू वस्तीत स्टीफन साहेबाला उभे करण्याचा अट्टाहास का?

मी देखील हेच विचारलं गाडगीळसाहेबाना. तेव्हा ते म्हणाले, 'आम्ही काही माणसे हे जाणूनबुजून सतीचे वाण घेत आहोत. भारतीय राजकारण सुविहित व सुनियंत्रित रहावं यासाठी मध्यमवर्गीयांनी राजकारणाच्या प्रमुख प्रवाहापासून अलग होता कामा नये. स्वातंत्र्य लढ्याच्या परंपरेतून मध्यमवर्गीयाकडे आलेले हे इतिहासदत्त कार्य आहे. त्या कर्तव्यापासून तुम्ही 'नारायण सदाशिव शनवारे' च्युत होत आहात. पण आमच्यासारखे जागले. स्वत: खर्ची पडून तुम्हाला कर्तव्यच्युत होऊ देणार नाहीत.'

वरेच फाकडे बोलायला लागले की हे बॅरिस्टर!

वा, ते काय विचारता. 'इतिहास–दत्त कार्य,' 'सतीचं वाण,' 'कर्तव्यच्युति' हे सावरकरी शब्द अलीकडे 'केसरी'त सुद्धा आढळत नाहीत. मी तर दबूनच गेलो. पण तेवढ्यात चाफाजीपाटील आले आणि बोलणे त्याच्या उमेदवारीकडे वळले, तसा सोलापूर जिल्हा पहिल्यापासून कॉंग्रेसलाच वाहिलेला आहे; तेव्हा कॉंग्रेस (आय्) कडे त्यातला घसघशीत वाटा येणारच. बरं, चाफाजीराव म्हणजे तालेवार उमेदवार. तेव्हा त्यांना तिकीट मिळायला अडचण पडू नये, असे आम्हा तिघाचेही मत पडले. खेरीज यशवंतराव, वसतरावदादा यांच्याशी चाफाजीचा दोस्तानाही पुरातन.

यशवंतरावांचा इथे काय संबंध?

हे यशवंतराव म्हणजे चव्हाण नव्हेत; आपले यशवंतराव मोहिते. हल्ली इंदिरा कॉंग्रेसमध्ये यशवंतराव म्हटले की मोहितेच. चव्हाणांना सगळेच विसरलेत. तर काय सांगत होतो की, चाफाजीरावानी दुपारी तीनच्या सुमारास बाईंच्या कोठीवर जाऊन पार्लमेंटरी बोर्डासमोर आपली कैफियत मांडावी असे ठरले. पुढचे सगळे विठ्ठलराव पहाणार होते.

म्हणजे काम झालेच म्हणायचे.

झालं कसचे. खरा वांधा इथेच आला. आम्ही तीन वाजता कोठीवर गेलो. अजून मंडळी यायची होती. एका खोलीत संजय, धवन आणि फ्रॅंक अँथनी असे तिघे बहुधा कोर्टात काय स्ट्रॅटेजी लढवायची त्याचा विचार करत होते. बाहेर लॉंजवर यशपाल कपूर यूथ कॉंग्रेसच्या जमावाला कोर्टाबाहेर कोणत्या घोषणा द्यायच्या ते समजावून सागत होता. बरेचसे वार्ताहर आत-बाहेर घोटाळत होते, त्यांच्यात आपली दोन-तीन मंडळीही दिसली.

आं, ती तिथे कशी काय?

अहो कुणी 'चिकमगळूरनंतर' हे पुस्तक लिहिताहेत तर कुणी लिहिताहेत 'सत्तेकडे डोळसपणे.'

पण, वर्तमानपत्राची कात्रणं चिकटवायची सोडून ही मंडळी प्रत्यक्ष हिंडायला केव्हा लागली?

मी असे ऐकले की, या मंडळीनी लिहिलेली पुस्तके वाचून बाईंनी त्याना 'पुढची पुस्तके लिहिताना प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहून लिहा' असा निरोप धाडला आणि केव्हाही येऊन राहण्याचे निमंत्रण दिले.

पण चाफाजीरावाचे काय झाले?

हां. तर भरली बैठक. पहिला प्रश्न होता, बाईंनी कुठून उभे राहायचे, हा. कमलापतीजी म्हणाले की, बाईंनी रायबरेली सोडता कामा नये. कर्नाटकचे गुंडू राव म्हणाले की, चिकमंगळूरचे लोक रागावतील बाई तिकडून उभ्या राहल्या नाहीत तर. प्रमिलाबाई चव्हाण म्हणाल्या की, वर्ध्याची जागा बाईंसाठीच आहे. विनोबांचा आशीर्वाद आहे त्याना. चेन्ना रेड्डींनी मेदकची जागा देऊ केली. इतक्यात यशपाल कपूर एक तारांची चळत घेऊन आले. म्हणाले, 'तीनशे एकूणऐंशी मतदार संघातून माताजींना आमंत्रणं आलीत की, इथूनच उभे राहिले पाहिजे म्हणून. फक्त अमेथीचे लोक संजयसाठी अडून बसलेत.' बाईंनी अंतुल्यांकडे सूचक नजरेने पाहिले. अंतुले म्हणाले, 'माताजी तुम्ही सगळ्याच मतदार संघातून उभ्या रहा नाही तरी नावाला कोणीही उभे असले तरी खरी निवडणूक तुम्हीच लढवणार आहात.' बाई खालच्या ओठाचे डावे टोक वरच्या दाताखाली मुडपून आणि नाकाला सुरकुती पाडून स्मित करत्या झाल्या. विठ्ठलरावजींचा चेहरा मात्र पावसाळ्यात झाडावरचा डिंक ओघळतो तसा ओघळला

पण बरे झाले की, विठ्ठलरावजींची सुटका झाली. नाहीतरी ते पडणारच आहेत.

पडण्याचे विठ्ठलरावाना काही वाटत नाही. आता सवय झालीय त्याना. पण आपण लोकापुढे असले पाहिजे, अशी हौस त्याना आहे. 'यू शॉल नॉट इग्नोअर मी' असे ते नेहमी म्हणत असतात. तेव्हा बाई विठ्ठलरावाकडे वळून म्हणाल्या, 'ॲनी कॉमेंट्स, स्मरण,' हल्ली विठ्ठलरावांना त्यांनीच दिलेल्या 'स्मरण सतोष' या पदवीचा असा संकोच माताजी कधीकधी करतात. विठ्ठलराव म्हणाले, 'माताजी, ते कसे शक्य आहे? इंग्लंडच्या इतिहासात असे कधी झाले नाही. अगदी लॉइड जॉर्जने देखील आपल्या उमेदवाराना खास कूपन्स दिली तरी स्वत सर्व मतदारसंघातून निवडणूक लढवली नाही.' 'पुरे तुमचे इतिहासाचे दाखले; आम्ही

इतिहास घडवीत असतो.' माताजी जिजाऊंच्या आढयतेने म्हणाल्या. शिवाय ते सोईचेही पडेल. नाहीतरी इथूने सगळ्याची भाषणे लिहून द्यावी लागतातच. आता मी एकटीच बोलणार. पुढे पार्लमेंटातही सगळे कसे एकसुरी काम चालेल. इमर्जन्सी नको नि सेन्सॉरशिपही नको.'

'पण माताजी, इमर्जन्सीत तुमचीही भाषणे सेन्सॉर होत होतीच की,' विठ्ठलरावांनी धैर्य अगदी एकवटले होते.

'स्मरण, कसे रे कळत नाही तुला! ज्या एक्सेसबद्दल मी लोकांची माफी मागत असते, ती हीच,' बाईंनी आपुलकीचे हास्य केले. तसा टेबलाच्या चहू बाजूंनी हशाचा खकाणा उडाला?

'पण मग राखीव मतदारसघाचे काय करणार तुम्ही?' बॅरिस्टरसाहेबांनी अखेरचा आधार घेतला.

'ती एक मेली अडचण आहे. खरे म्हणजे माझ्याइतकी दलित कोणी व्यक्ती असेल का? पण नाही. आईबाप दलित पाहिजेत. काहो बॅरिस्टर, तुम्ही बुद्धिमते स्वातंत्र्याचे डांगोरे पिटता, पण मुलांना आईबाप निवडण्याचे मूलभूत स्वातंत्र्य नाही याविषयी कधी बोलता का?'

'बरोब्बर बोललात माताजी. मुले वयात आली की, रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टने त्याना आईवडील बदलून घेता येतील असा कायदाच करू आपण,' अंतुले म्हणाले.

मग शेवटी ठरले काय?

ठरणार काय, हेच की, सगळ्या सर्वसाधारण मतदारसंघातून बाईच उभ्या राहणार. राखीव मतदारसंघातही एकच उमेदवार सगळ्या ठिकाणी उभा करायचा. तो कोण ते बाईच ठरवणार आहेत.

म्हणजे चाफाजीराव आणि विठ्ठलराव ठीकच्या ठिकाणीच राहिले की.

हो ना. पण बाहेर आल्यावर विठ्ठलराव मला म्हणाले, 'मास्तर, बघितलं का कशी युक्ती केली ती!'

मी म्हटले 'कसली?'

'अहो, संजयला अमेथीहून उभे करण्याचा डाव तर उधळला की नाही?'

मी म्हटलं, 'पण त्यात तुम्ही काय केले? तुम्ही तर अंतुल्यांच्या ठरावाला विरोध करत होता.'

विठ्ठलराव डोळे मिचकावून म्हणाले, 'मास्तर, त्याला हलवून खुंटा बळकट करणे म्हणतात. तुला नाही कळायचे ते.' ☐

पुस्तक प्रकाशन

# तीन तास कसे गेले ते कळलेही नाही

सध्या महाराष्ट्रातले वातावरण पु. ल. मय झाले आहे. वर्तमानपत्रात कोठे ना कोठे, ना नाही त्या निमित्ताने पु. ल. आहेतच. पु. लं. च्या आठवणी, चित्रपटातले पु. ल., नाटकातले पु. ल., संगीतप्रेमी पु. ल., बाबा आमटेंच्या आनंदवनातले पु. ल. असे नाही एकसारखे कोठे ऐकू येते आहे, कोठे वाचनात येते आहे. श्री. पु. ल. देशपांडे यांचा साठावा वाढदिवस त्यांची इच्छा नसली तरी चोहोबाजूनी साजरा होतो आहे. या वाढदिवसानिमित्त पु. लं. च्या वेचक साहित्याचा एक संग्रह श्री. जयवंत दळवी यांनी केला. त्या संग्रहाचे नांव 'पु. ल. : एक साठवण'.

या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ रविवार दि. १८ नोव्हेंबर १९७९ रोजी सायंकाळी पाच वाजता रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी मुंबई येथे साजरा झाला. रवींद्र नाट्यमंदिरातले वातावरण अगदी घरगुती समारंभाचे. दारावर अत्तर लावले जात होते. स्त्रियांना गजरे दिले जात होते. त्याचा समिश्र सुगंध दरवळत होता. निमंत्रणपत्रिका अगदी कडकपणे तपासल्या जात नव्हत्या. तरी कोठे गोंधळ नव्हता. आरडाओरडी रेटारेटी नव्हती. इथेतिथे उभे राहून लोक मजेत हसत-बोलत होते. हळूहळू आत शिरत होते. कवी, लेखक, नट, संपादक, प्रकाशक सगळ्यांची उपस्थिती होती. मंगेश पाडगांवकर, रमेश देव, अरुण सरनाईक, आशालता वाबगावकर, सरोजिनी वैद्य, शंकर वैद्य, विजया राजाध्यक्ष अशा निरनिराळ्या क्षेत्रातल्या मान्यवर व्यक्ती दिसत होत्या. पु. लं. वर प्रेम करणारे शेकडो वाचक दूरदूरच्या उपनगरातून आले होते. सपूर्ण रवींद्र नाट्यमंदिर तुडुब भरले होते. खुर्च्यांच्यामधल्या मोकळ्या पॅसेजमधेही लोक उभे होते.

अगदी ठीक पाच वाजता पडदा वर गेला. आणि वीणा देव प्रास्ताविक बोलण्यासाठी उभ्या राहिल्या. त्यांनी पुस्तकाची औपचारिक माहिती सांगितली. ग्रंथाची पहिली आवृत्ती प्रकाशनापूर्वीच संपली आणि ते मानधन पु. लं. देशपांडे फौंडेशनला मिळणार असल्याचे सांगितले यानंतर पु. ल. देशपांडे यांच्या मातोश्रींचा पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. समारंभाची सूत्रे न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी स्वीकारावीत अशी विनंती केली गेली. न्यायमूर्तींनी व्यासपीठावरील सर्वांचा पुष्पहार देऊन सन्मान केला, आणि औपचारिकरीत्या 'पु. ल. : एक साठवण' या जयवत दळवी यांनी संपादित केलेल्या आणि कोठावळे यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन केले.

यानंतर भाषणांना सुरुवात झाली. सर्व बोलले, मौज प्रकाशनाचे श्री. श्री पु. भागवत यांनी श्री. पु. ल. देशपांडे यांच्या काही आठवणी सांगितल्या. त्यांच्या साहित्याचे विशेष सांगितले. ते म्हणाले, 'मॅजेस्टिक बुकस्टॉलचे कोठावळे इतके विनोदी असतील असं वाटलं नव्हतं की पुलवर बोलायला मला बोलावतील! एका ग्रीक पुतळ्याची आठवण होते. त्याला दोन मुखवटे असत. एक हसणारा आणि दुसरा रडणारा! मी पु. ल. देशपांडे यांच्यात असा फरक आहे. त्यांना भाई म्हणण्याइतकी जवळीक मी साधू शकलो नाही. ते मला पी एल्. आणि मी त्यांना श्री. पु. च राहिलो. मी त्यांना प्रथम 'वहिनी' नाटकात पाहिले. सौ. ओगले वहिनींच्या भूमिकेत होत्या. धाकटे दीर म्हणून पु. ल. देशपांडे शोभून दिसत होते. तेव्हा ते गोजिरवाणे होते. (श्री. भागवतांनी 'तेव्हा' शब्दांवर जोर दिल्यामुळे सभागृहात हास्याची लाट उसळली.) नंतर त्यांच्या घरी त्यांच्या 'तुका म्हणे आता' या नाटकाचे त्यांचे नाट्यवाचन ऐकले. ते फारच सुंदर वाटले. पाहुण्यांची सरबराई करीत अतिशय

कार्यक्षमपणे सुनिताबाईही वावरत होत्या. पु. ल. देशपांडे यानी साधा लेंगा, झब्बा घातला होता. सुनिताबाईंची सुती साडी होती. नंतर पी. एल् मोठे झाले. पण दोघे तसेच साधे राहिले. त्याना यश, संपत्ती मिळाली. पण आईच्या कहाण्यातून जे 'उतू नको मातू नको' ऐकले होते त्याप्रमाणेच ते वागले. ते उतले नाहीत. मातले नाहीत. अजून त्यानी लिहिलं पाहिजे. या पुस्तकाचा दुसरा खंड पधरा वर्षांनी म्हणजे त्यांच्या पंचाहत्तराव्या वर्षी प्रसिद्ध व्हावा. जयवंत दळवीनीच तो संपादित करावा आणि मॅजेस्टिकच्या कोठावळ्यानी प्रकाशित करावा. पु. लं. ना अनेक देणग्या आहेत– अभिनय, संगीत, लेखन. पण सगळ्यात मोठी देणगी सुनिताबाई आहेत. ते लेख लिहून मोकळे होतात. बाकी जबाबदारी सुनिताबाईंची. पु. ल. देशपांडे यानी श्री. कृ. कोल्हटकर, गडकरी याची विनोदी परंपरा पचवून स्वत.ची विनोद-निर्मिती केली. त्याचा 'अंतू बर्वा' 'संगीत चिवडामणी' यातील विनोदातून करुणेचा द्रव वाहतो. पुष्कळदा विनोदी लेखक स्वत.ला विदूषक मानतो, बहुरूपी म्हणतो मग आपणही त्यांना तसेच समजतो. तो लेखकही स्वत्व गमावतो आणि मुखवटयाच्या मोहात पडतो. पण पु. ल. देशपांडे यांनी स्वत्व गमावले नाही. त्याची आई म्हणते, 'जेव्हा माझं मन सैरभैर होतं तेव्हा मी भाईचं पुस्तक वाचते. आणि मन शात होते.' कोणत्याही आईने पुत्राचं असं कौतुक केलं नसेल. कोणत्याही पुत्राने आईचे इतके चागले ऋण फेडले नसेल.' शेवटी पी. एल् ना साठीच्या निमित्ताने शुभेच्छा व्यक्त करून श्री. भागवत यानी आपले भाषण संपविले. नंतरचे वक्ते होते श्री. म. वि. राजाध्यक्ष. त्यानी पुलच्या कवितांप्रेमाची माहिती दिली. ते म्हणाले, 'पु. लं. देशपाडयाचे काव्यवाचन फारसे कोणाला माहिती नाही. केशवसुत आणि पु. शि. रेगे या भिन्न प्रकृतीच्या कवीच्या कविताचे ते सारख्याच तन्मयतेने वाचन करीत. रेग्यांना जनसमुदायापर्यंत पोहोचविले पी. एल्नीच मराठीतले उत्तमोत्तम कवी त्यांनी वाचले आणि लोकापर्यंत पोहोचविले. अत्रे, गडकरी यांच्या विनोदाला पु. ल. देशपाडे जशी दाद देतात तशीच ना. घ. देशपाडे, शरच्चंद्र मुक्तिबोध याच्या कवितांनाही देतात. कवीची संवेदनशीलता त्यांच्या ठिकाणी पूर्वीपासून होती ती त्यांनी आजवर जपली आहे. म्हणूनच त्यांच्या विनोदात उपहास नसतो. कटुता नसते.' श्री. राजाध्यक्षाचे भाषण संपल्यावर उभे राहिले कवी श्री. बा. भ. बोरकर. ते म्हणाले, 'पी. एल्. या एकंदर व्यक्तिमत्त्वाला इतके पैलू आहेत की समजणे कठीण. ऋग्वेदीच्या घरी मी बाविसाव्या वर्षी गेलो, तेव्हापासून मी त्याना ओळखतो. आधी ऋग्वेदीचा नातू म्हणून आणि नंतर पी. एल्. म्हणून. पी. एल्. विसंगती चार्ली चाप्लीनच्या दृष्टीने पाहतात आणि सगती वृद्धिगत कशी होईल ते टागोरांच्या दृष्टीने पाहतात. रविंद्रनाथानी वाङ्मयाच्या ज्या शाखेला हात लावला ती बहरली. पी. एल्. चेही तसेच आहे. पी. एल्. कवी आहेत, पत्रही कवी लिहितात हे मला माहिती आहे. मात्र ते उजळ माथ्याने कविता प्रसिद्ध करीत नाहीत ही माझ्यासारख्यावर कृपा. पु ल. उत्तम गातात. पेटी वाजवतात. मात्र ते कलावत म्हणून मोठे आहेत, त्यापेक्षा माणूस म्हणून मोठे आहेत. सुख वाढावे आणि दु.ख कमी व्हाव यासाठी ते कटीबद्ध आहेत. या वृत्तीमुळे अंधासाठी काही केले पाहिजे, कुष्टरोग्यांसाठी काही केले पाहिजे असे त्याना वाटते. मुलाचे गुण वाढविण्याचा प्रयत्न ते करतात. त्यात आपण काही केले असे त्याना वाटत नाही. वयाच्या पन्नासाव्या वर्षी रवींद्राच्या प्रेमामुळे ते बंगाली शिकले, बोलले, बाऊल लोकामधे फतकल मारून बसून त्याच्यामध्ये गायले. असे हे पु. ल. प्रतिभेने थोर आहेत, वृत्तीने कलंदर आहेत आणि कुणी फास गळयात अडकवू पाहील तर तो त्याच्याच गळयात अडकवण्याइतके विलंदर आहेत.' शेवटी 'तुझ्यासारखा तूच आनदयात्री' असे आपण पुलंना पत्रात लिहिल्याचे सागून श्री. बा. भ. बोरकरांनी भाषण संपविले. न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी म्हणाले, 'पु. ल. खरोखर वाचकाचे आहेत. मी वाचकांचा प्रतिनिधी. मी तुलनेच्या विरुद्ध आहे. पुलंची कोणाशी तुलना करू नका. त्याच्या विनोदांनी तुम्ही हसता यापेक्षा आनंदवनातला महारोगी हसतो हे महत्त्वाचे आहे. साठनंतरचे आयुष्य हे प्रसादाचे आयुष्य आहे. भाईंनी ते मुलांसाठी खर्च करावे.'

कोणत्याही व्यक्तीच्या गौरवसमारंभी होणारी ठरीव औपचारिक भाषणे असतात तशी ही भाषणे नव्हती. प्रत्येक व्यक्तीच्या बोलण्याला एक वैयक्तिक स्पर्श होता त्यातून पुलंची काही नवी ओळख होत होती. कोणतीच अतिशयोक्त कृत्रिम स्तुती नसलेले श्री. श्री. पु. भागवत याचे भाषण अगदी आटोपशीर, विवेचक तरीही ललित गमतीचे होते. श्री. म. वि. राजाध्यक्ष आणि बा. भ. बोरकर याच्या भाषणात अनेक वर्षांच्या ओळखीचा जिव्हाळा होता. तर श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी याच्या बोलण्यात पुलंच्या वाचकाच्या हृदयातला प्रेमभाव होता.

सर्वांची भाषणे आटोपल्यावर पु. ल. बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, 'मी उत्तुग प्रतिभेची माणसे पाहिली आहेत. मी कुणी मोठा नाही. मी माझ्या गल्लीतला ब्रॅडमन आहे. ज्याअर्थी मी वाचकाना भिडतो त्याअर्थी मी कोणी आहे. मी तसा नाही म्हणणे म्हणजे वाचकांचा अपमान. माझ्या वाढदिवसाला हजारो पत्रे आली मी गुदमरून गेलो. मी कृतज्ञता व्यक्त करण्यापलीकडे काही करू शकत नाही. आपण माझ्यावर शुभेच्छा वर्षाव करता! बलवर्धक औषध घ्यायला नको– एकेक पत्र शक्ती देईल. आजच्या Ph. D. करणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनी मला विचारतात, तुमच्या लेखनाची प्रेरणा काय? मी सांगतो मला जे वाटतं ते दुसऱ्याला सागावंसं वाटतं म्हणून मी मनाच्या तगाद्यानं लिहितो. विनोदी लेखकाला बेसूर जास्त जाणवतो म्हणून तो सुरांचा ध्यास घेतो. हल्ली विनोदाच्या क्षेत्रात राजकारणातल्या लोकानी आमच्याशी कॉम्पिटिशन सुरू केली आहे म्हणून आता आमचं कसं होणार याची काळजी पडली आहे. तुम्ही माझ्यावर खूप प्रेम केलं आहे. माझ्या पुस्तकाच्या पाचच्या पाच हजार प्रती तुम्ही पंचवीस रुपये देऊन घेतल्यात. या महाराष्ट्रात पुस्तकांवर एवढा खर्च करणारी माणसे आहेत. जयवंत दळवीनी या पुस्तकासाठी फार श्रम घेतले. माझ्याकडे बायको प्रुफे तपासते. एका हातानी डाळ निवडते, दुसऱ्या हाताने प्रुफ– दोन्हीतले खडे काढते. पण जयवंत दळवी स्वत प्रूफ तपासतात. मौजच्या छपाईबद्दल बोलणं म्हणजे राजहंस पांढरा आहे अस सागणं!

आजच्या भाषणांना मी काय उत्तरे देणार ? वृद्धाचा सल्ला घ्यावा तर ते अजून माझ्याकडे चमत्कारिक नजरेने पाहतात. मी नववृद्ध आहे म्हणून की काय कोणास ठाऊक ! मी काय सागणार ? परवा पाडगावकरांनी सांगितल एका उपाहारगृहाबाहेर पाटी होती पु. ल. देशपांडे यांच्या वाढदिवसानिमित्त आठ नोव्हेंबर ते आठ डिसेंबर पदार्थाचे दर दहा टक्के कमी ! माझ्या खाद्यजीवनाची इतकी कीर्ती पसरली ? माझ्यामुळे तुम्हाला वडे स्वस्तात खायला मिळाले तर मला आनदच आहे. माझ्यावर प्रेम केलत तस मराठी साहित्यावर प्रेम करा. मराठी वाड्मयात किती नवे प्रवाह येत आहेत! गावकुसाबाहेरच वाड्मय आल आहे. विनोदी लेखक त्याच्यातून निर्माण व्हावा. जास्त काय सागू !' अशी कृतज्ञता व्यक्त करीत त्यानी आपले चुरचुरीत भाषण सपविले नतर कृष्णराव हरिहर याच्या व्यक्तिचित्राचे वाचन केले. ते मी पूर्वीही कोठेतरी वाचले होते. पण आज वाटले, ते वाचायचे नाहीच, ते पु. लच्या तोडून ऐकायचे. त्याशिवाय रावसाहेबाच्या मराठीचा कानडी ढग कळणार नाही. रावसाहेबाच्या व्यक्तिमत्त्वाचे मर्म उमगणार नाही.

रात्री पावणेआठच्या सुमाराला कार्यक्रम सपला. सुमारे तीन तास कसे गेले ते कळलेही नाही. मी नेहमी पाहिले आहे पुलचे कार्यक्रम अगदी ठीक वेळेवर सुरू होतात आणि कंटाळवाणी लाबण न लागता सहज सपतात. ( फारच थोड्या जाहीर समारभाच्या बाबतीत हे प्रत्ययाला येते ) यात सयोजकाचे श्रेय असेलच पण पु लंच्या बाबतीत वेळेचा काटेकोरपणा पाळलेला नेहमी आढळतो. काही महिन्यापूर्वी शारदा थिएटरमध्ये दातेसूचीग्रथाच्या दहाव्या खडाचे प्रकाशन पु. ल. देशपाड्याचे हस्ते झाले होते. तोही कार्यक्रम अगदी वेळेवर सुरू होऊन वेळेवर संपला होता. काही वर्षापूर्वी पु. लचा पार्ल्यात टिळक मदिरमध्ये कोणत्यातरी कारणाने सत्कार होता. अत्रे आले होते. अत्र्यांनंतरचे पुलचे भाषण नेहमीप्रमाणे रगले. पण बोलता बोलता ते घड्याळाकडे बघून मध्येच म्हणाले, 'मला माहिती आहे, शेवटच्या गाडीची वेळ होते आहे, मी त्यापूर्वी थांबणार आहे.' आणीबाणीतल्या निवडणुकीच्या काळात पार्ल्यातील मिठीबाई कॉलेजपुढे त्याची सभा झाली. तेव्हाही शेवटच्या गाडीच्या वेळचे भान ठेवून ते थोडा वेळ थाबले. लोकाना जाऊ दिले आणि त्यांनी सभा पुन्हा सुरू केली. समोरच्या श्रोत्याना दिपवन टाकण्याची धडपड करणारे, पुष्कळदा त्याचा अतच पाहणारे वक्ते अनेक. पण आपल्या भाषणाला आलेल्या लोकाना शेवटची गाडी कशी मिळेल याची चिंता वाहणारे मला वाटते पु ल. एकटेच वक्ते आहेत. असो.

चित्रपटातल्या कलावताना किंवा क्रिकेटीअरने अमाप लोकप्रियता महाराष्ट्रात एका साहित्यिकाला मिळाली आहे, यात त्या साहित्यिकाचा आणि महाराष्ट्राच्या साहित्यप्रेमाचा गौरव आहे.

—प्रतिनिधी

---

'फिनिक्स' निवड

# The Andaman Story

**N. Iqbal Singh**
**Vikas Publishing House Pvt. Ltd.**
**Pages 321, Rs. 75/–**

---

अंदमान एखाद्या उंच पर्वतावरून कसे दिसत असेल ? एखाद्या विमानाच्या खिडकीतून ते कसे दिसत असेल ? एखाद्या गौरवर्णी, सुदर स्त्रीच्या गळ्यात एखादी हिऱ्याची माळ चमकावी तसे ते दिसत असेल. आसमंतात नितळ निळे आकाश. याच निळसरपणाचे प्रतिबिंब पाण्यात. प्रदूषणाचे नावनिशाण नाही. जिथे गर्द हिरवी झाडी व इतर वनस्पतींच्या कैक हिरव्या छटा पाण्याचे चुबन घेत असतात, आणि जणू या प्रेमाने व शाततेने भरलेल्या वातावरणात आपणही सत्कृत्यात भर घालावी म्हणून पाणी आकाशाचे वर्तुळात्मक दीर्घ चुबन घेत राहाते. आभाळ मेघानी भयावह झाले तर पाणीसुद्धा तात्कालिक रग बदलून काळे होते. आभाळ जर निळसर झाले तर पाणीसुद्धा आपल्या प्रियकराचा रग उचलते. नभ आणि नीरचा हा सुसवाद हा rapport ही १०० टक्के जुळलेली वेव्हलेंथ ही जुगलबदी, हा रोमान्स बघायचा असेल तर तो अदमान बेटावरच. जणू अदमान बेट म्हणजे या सथ, शात, निरपेक्ष प्रणयापासून निर्माण झालेले अपत्यच.

कोणत्या अरसिकाने या परिसराला काळे पाणी असे नाव दिले होते ? आणि या इथे, निसर्गाच्या कुशीत, शात आणि समोहित वातावरणात, शिक्षा म्हणून कैद्याना आणले जात असे ? का कैद्यानी अतर्मुख होऊन सुधारावे म्हणून ही जागा निवडली होती ? असे असेल तर ती शिक्षा म्हणता येणार नाही. तो एक उपभोग म्हणावा लागेल.

एकदा प्रख्यात लेखक कॉम्प्टॉन मॅकेन्झी म्हणाला होता. 'जर माझ्या खात्यात फक्त २५० पौंड शिल्लक असते तर मी निकोबार बेटात कायमचा वसाहतीसाठी गेलो असतो. पण मॅकेन्झीकडे या रकमेवर बरीच शून्य ठेवता येतील एवढी रक्कम होती तो निकोबारमध्ये गेला असता तर कन्झुमर आयटेमच्या अभावामुळे ती रक्कम खर्चूच शकला नसता.

गेल्या कित्येक वर्षात अंदमान व निकोबारबद्दल एवढे माहितीपूर्ण पुस्तक प्रकाशित झाले नाही. माहितीपूर्ण असले तरी उद्धृत केलेल्या विपुल उपायामुळे हे पुस्तक क्वचितप्रसगी कटाळवाणे वाटते. हा कटाळा सरदारजीच्या इडीयमॅटिक इंग्रजीमुळे थोडासा कमी होतो. खुशवन्तसिंग वगळता आणखीन एक सरदारजी इतके चागले इग्रजी लिहू शकेल याची कल्पना नव्हती. शैलीत सयम, अडरस्टेटमेट व एक प्रकारची अलिप्तता आहे या सरदारजीनी आकाशवाणीची ३० वर्षे सेवा केली. त्यातील शेवटची चार वर्षे त्यानी अदमान व निकोबार बेटावर काढली त्यानी तेथील जमातीशी जारवा, ओगे आणि निकोबारची शोपेन संवाद साधला.

या काळ्या पाण्यात सावरकर, भाई परमानद, ओरबिंदूचे बधू बी. के. घोष, बटुकेश्वरदत्त वगैरे देशभक्ताना डाबले गेले होते. या व इतर कैक कैद्याना काळ्या पाण्यात दिली गेलेली वागणूक ही किती निर्घृण व अमानुष होती त्याची एक आख्यायिकाच निर्माण झाली आहे. अदमानची वर्तुळाकार तुरुंग म्हणजे टुरिस्ट लोकाना

बॅस्टिल म्हणून दाखविला जातो. (बॅस्टिल हा फ्रान्सचा प्रख्यात तुरुंग. येथे व्हॉल्टेअर फुके याना डाबले होते.) 'काळे पाणी' हे शब्द ऐकून त्या वेळच्या निर्ढावलेल्या गुन्हेगारांच्या पोटात गोळा येई इकबालसिंगनी कैद्यांची बाजू व जेल उच्चाधिकाऱ्याची बाजू ऐकून घेऊन असा निष्कर्ष काढला की, भारतातील तुरुंगासारखेच अंदमानातील ते तुरुंग होते.

बहुताशी हे पुस्तक तुरुंग व कैदी या विषयाभोवती घुटमळत असले तरी मधेमधे बालसिंगनी अंदमान बेटाचे इतर पैलू रेखाटले आहेत. १९०७ नंतर अंदमान बेटावर राजकीय कैदी मोठ्या प्रमाणात पाठवले गेले. मुळात तेथे कैदी पाठवावेत की न पाठवावेत हा ब्रिटिशांमध्ये एक नेहमीचा वादाचा मुद्दा असे. तेथील वर्तुळाकार तुरुंग हीसुद्धा एक विक्षिप्त वास्तु होती. मध्य वास्तु गोलाकार व त्यातून लावच लाव सहा फाटे निघालेले. वीर सावरकराचा जेल नं. ४३ चा होता. अंदमानात १९४१ मध्ये भूकंप झाला त्यात मध्य वास्तु (मिनार) पडली गेली. त्याच्या जागी एक लाकडी मिनार बांधला गेला व घटेचा पूर्वीचा बुलंद आवाज ऐकू येईनासा झाला.

या स्वच्छ, सुंदर व flora आणि fauna ने संपन्न असलेल्या बेटावरचे मूळ रहिवासी असतील तरी कसे हा विचार कित्येकदा माझ्या मनात आला होता. येथील मूळ रहिवासी जार्वान्स, ओगे व निकोबारचे शोपेन. याचे या पुस्तकातील फोटो बघून माझी फार निराशा झाली. कधीकधी एखाद्या स्त्रीची पाठमोरी आकृती इतकी लोभस व कोरीव पुतळ्यासारखी दिसते व आपल्याला आता एक सुंदर चेहरा बघावयास मिळेल या अपेक्षेने आपण वळून बघतो व आपली निराशा होते असेच माझे झाले. काही जमाती आफ्रिकन्ससारख्या तर काहीचे चेहरेमोहरे मंगोलियन टाईपचे. येथील स्त्रिया टॉपलेस तर राहतातच, शिवाय बॉबकटसारखे केस व खाली लुंगी ! काही काळ्या कातडीचे तर काही थोड्याशा गौर कातीचे. या सर्व लोकाची संस्कृती म्हणजे एक खिचडीच. तरी सर्व जमाती खेळीमेळीने एकत्र कशा रहातात याचे हे बेट म्हणजे उत्तम उदाहरण आहे. न भांडण्याचं कारण असावं निसर्गाशी जोडलेलं नातं ! येथील मुस्लिम, हिंदू व ख्रिश्चन मिशनरी लोकाना धर्म बदलण्यासाठी उपदेश करतात; पण ते फारसे यशस्वी होत नाहीत. या लोकांना सुंदर जरी म्हणता येणार नाही तरी नैसर्गिक जीवन जगल्यामुळे व निसर्गाच्या कुशीत वाढल्यामुळे त्याच्या चर्येवर एक प्रकारची निरागसता व समाधान दिसून येते. टॉपलेस राहिल्यामुळे का कुणास ठाऊक, येथील लोकात Sexual repression अजिबात दिसून येत नाही आणि हे repression नसल्यामुळे त्यांच्यात इतर व्याधी (emotional Complications) कमीच.

एखादी निकोबारी झोपडी किंवा त्याचा फोटो आपण पाहिला आहे का? लहान मुलांना एकदम आवडून जावी अशी ही झोपडी असते. जणू उंच उंच खांबांवर अगदी बारीक प्रवेशद्वार असलेली ही झोपडी म्हणजे weaver bird (डुडा) पक्ष्याने विणलेले गोलाकार घरटेच.

या रम्य बेटावरील मुख्य भाषा म्हणजे अगदी साधे व सोपे हिंदी हे वाचूनही मला आश्चर्य वाटले त्याचे कारण येथील मूळ रहिवाशाचे चेहरेच इतके परदेशी वाटतात की, ते हिंदी बोलू शकतील याची कल्पनाच करवत नाही. अगदी अलीकडे येथील लोकावर संस्कृतप्रचुर हिंदी लादण्याचा प्रयत्न केला गेला पण यालाही प्रतिसाद दिला नाही. तुम्ही दक्षिण, मध्य किंवा उत्तर हिंदुस्थानातले असा, तुम्हाला जर येथे नोकरी हवी असेल तर हिंदी हे मस्ट आहे.

१९६३ मधे कलकत्ता व पोर्टब्लेअर इंडियन एअर लाईन्सने जोडले गेले. या जेट-सेट युगात अंदमानात शिरायला अवघे दोन तास लागतात. या बेटावरची आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे त्याच वर्षी आकाशवाणीने तेथे एक केंद्र उभारले. या बेटावर करमणुकीची कोणतीच साधने नाहीत असे सरदारजी म्हणतात. परंतु ही साधने नाहीत म्हणून तर टुरिस्ट लोकाना तेथे जावेसे वाटते. शहराच्या रोजच्या रॅटरेसपासून लाब. नाही म्हणायला तिकडे एक-दोन चित्रपटगृहे आहेत. पैकी एकाचे नाव माऊंटबॅटन सिनेमा असे आहे !

ग्रेट निकोबार हा भारताचा सुमात्रा, इंडोनेशिया याच्या सर्वात जवळचा प्रदेश. शोम्पेन जमात ही इथेच रहात असते. पण त्यांची संख्या कमीकमी होत आहे. इथे बऱ्याच सरदारजीनी (माजी सैनिक) वसाहत केली आहे. येथे आलेल्या सरदारजींचा उत्साह अमाप होता. 'हम इधर नया पंजाब बनाएंगे, यार' अशा घोषणेने थोड्या महिन्यातच त्यानी हरितक्राती करून दाखवली. युद्ध, हरितक्राती आणि दाढी वाढवणे या तिन्ही गोष्टीत सरदारजी पटाईत असतात असे म्हटले जाते. पण मला वाटते कोणतीही गोष्ट करताना सरदारजी आपल्याला त्यात झोकून देतो. सायकल पार्ट्स, मोटर पार्टस्, ट्रक ड्रायव्हर्स वगैरे क्षेत्रात काय कमी सरदारजी आहेत ?

या बेटावर फारसे औद्योगीकरण झालेले नाही याची थोडीशी खत इकबालसिंगना वाटते. येथे विमको व अंदमान टिंबर इंडस्ट्रीज हे दोन मोठे उद्योग सोडल्यास इतर मोठे उद्योगधंदे नाहीत. पण येथे उद्योगधंदे वाढले तर प्रदूषण वाढणार नाही का? तेथील रहिवाशांना ते जरूर हवे असेल. का औद्योगीकरणाशिवाय राहणीमान उंचावणार नाही व अंदमानाचा पचका होणार नाही? परंतु इतर शहरातील औद्योगीकरणाचा अभ्यास करून आधीच प्रदूषणरहित औद्योगीकरण केले तर येथील टुरिस्ट पोटेन्शियल बरेच वाढेल.

–जे एन्. पोंडा

## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| १ : वाचता वाचता : (लेखसंग्रह)– 'वाचस्पती'– | रु. २५/– |
| २ : तुकडे तुकडे सूर्य. (कादंबरी)– लीला श्रीवास्तव | रु. १५/– |
| ३ : आपण व आपले आरोग्य : संपादक : डॉ. वि. ना. भावे, डॉ. न. शं. देवधर, डॉ. सु. वि. भावे. | रु. २५/– |
| ४ : तिसरे महायुद्ध (आगामी युद्धाची ज्वलत, खळबळजनक व अंगावर काटा आणणारी कथा)– रवींद्र गुर्जर | रु. १५/– |

ENGLISH

| | |
|---|---|
| 1 : Hunt : ( A Psychological thriller )– A. Alvarez | Rs. 17–50/– |
| 2 : The Saint in Trouble : ( A brand new T. V. Saint story) Leslie Charteris | Rs. 15–20/– |
| 3 : Alien Meetings : ( Sightings of the third kind )– Brad Steiger | Rs 15–20 |
| 4 : The Strange world of Frank Edwards : ( Occultism )– Edited by Rory Stuart | |

'PHOENIX' is 'your' library. Take good care of the books of your library.
A 'PHOENIX' member is better informed !
दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे–४११ ०३०

# मराठी भाषा शिक्षणाचा शास्त्रीय प्रयोग

## डॉ. विजया चिटणीस यांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ

प्रा. गोपालदत्त कुलकर्णी

माझ्यासमोर दुर्मिळ अशी प्रचंड पृष्ठसंख्या असलेला, तेवढीच उपयुक्त गुणवत्ता असलेला ग्रंथराज परीक्षणासाठी आहे. त्या ग्रंथाची थोरवी आकारातून तर सहज दृग्गोचर व्हावी. परंतु पाने निव्वळ चाळत गेले तरी उपयुक्तता ठसठशीतपणे जाणवते. वास्तविक मराठी माणसाप्रमाणेच मराठी ग्रंथाचीही देहयष्टी हल्ली कृश होत चालली असता गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर भारत सरकारच्या म्हैसूरमधील सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ इंडियन लँग्वेजच्या वतीने मराठी भाषेच्या मौलिक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम प्रकाशित व्हावा व याची लक्षावधी शिक्षित वाचकांनाही माहिती नसावी हा मजेशीर प्रकार मानावा लागेल. वास्तविक हा लाबलचक इंग्रजी नावाचा मराठी प्रशिक्षणाचा ग्रंथराज इंग्रजी व मराठी असा द्वैभाषिक आहे. त्या राजकीय द्वैभाषिकाला कसून विरोध करणाऱ्या आचार्य अत्र्यांनी देखील ही विजयाबाई चिटणिसांची मराठी प्रशिक्षणाची 'बखर' पाहून धन्योद्गारांचा वर्षाव केला असता. वास्तविक ज्याची मातृभाषा मराठी नाही अशा इंग्रज, युरोपी, अमेरिकी प्रशिक्षणार्थ्यांप्रमाणेच महाराष्ट्रीयेतर बांधवांच्या मराठी शिक्षणाची हौस भागविणारा हा प्रचंड भाषासेतु आहे. आतरभारती म्हणजे काय चीज असते याचा बोध हा ग्रंथ परिशीलन करणाऱ्यांना सहज येऊ शकेल. हा ग्रंथ पाहून आमची तर अशी खात्री झाली की या ग्रंथांचे अध्ययन मराठी शिकणाऱ्या व शिकविणाऱ्या मराठी भाषिकांनीही आवर्जून करावे. बाल–भारती, कुमार-भारती, युवक–भारती, प्रमाणे डॉ. चिटणिसांनी सजविलेल्या मराठीच्या ह्या 'विश्वभारती' ग्रंथाचे प्रकाशन ही मोलाची भाषाशास्त्रीय घटना मानावी लागेल. सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ इंडियन लँग्वेजेसच्या विद्यमाने जे भाषा शिक्षणाचे प्रचंड अभ्यासक्रम तयार करण्याचे काम चालू आहे, त्या मालिकेत तरुण विदुषी डॉ. चिटणिसाच्या मराठीच्या अभ्यासक्रमाला प्रथम प्रकाशनाचा बहुमान मिळावा हा मराठीच्या राजभाषा वर्षातील मोठा योग–मणिकांचन संयोग मानायला हवा.

या ग्रंथाचे मराठी भाषा प्रशिक्षणाच्या कोशाचे शीर्षक, अर्पणपत्रिका, प्रास्ताविक, अनुक्रमणिका जरी अव्वल इंग्रजीत असली तरी इंग्रजी माध्यमातून मराठी शिकविण्याचा हा अत्यंत शास्त्रीय तेवढाच सोपपत्तिक प्रयत्न असल्याने संपूर्ण ग्रंथ चाळताना मौज वाटते. या सव्वाअकराशे पानांच्या सुमारे तीन-चार महिन्यात शिकवल्या जाणाऱ्या मराठी भाषा शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची अनुक्रमणिकाच भरपूर सोळा पृष्ठांची आहे. साध्या अनुक्रमणिकेपासून ग्रंथकर्तीचा शास्त्रीय दृष्टिकोन प्रत्ययाला यावा व तसा तो येतोही हे विशेष. ग्रंथ वाचताना जरी आपण स्वत.ला एखादा आफ्रिकी, अरब किंवा चिनी–जपानी किंवा युरोपियन समजून ग्रंथाकडे पाहू लागलो तरी अशा वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून लेखिकेने ग्रंथ सजविण्यासाठी केलेली मेहनत सहज जाणवते. त्यामानाने ग्रंथात रेखाटने कमी आहेत. प्रस्तुत ग्रंथाच्या तात्रिक अंगाचे चिकित्सक विश्लेषण करणे गरजेचे वाटत नाही, कारण थोर फ्रेंच पाणिनी झुल ब्लॉक परंपरेतील डॉ. कालेलकर व त्यांच्या शिष्या यांच्या कित्येक वर्षांचा अनुभवसिद्ध शैक्षणिक अनुभवाचा हा ग्रंथ म्हणजे मानबिंदू आहे, डॉ. 'कालेलकरांची व्याकरणाचे बाबतीतली 'ज्ञापकता' त्याच्या शिष्येने एक सुबोध तेवढाच सरस मराठी अभ्यासक्रम निर्माण करून देशोदेशीच्या व भारतीय राज्यातील मराठी शिक्षणार्थ्यांसाठी मोठी सोय करून ठेविली आहे वास्तविक सरकारी प्रकाशने बऱ्याच वेळा रसिकापेक्षा अधिक कीटकप्रिय (वाळवी) ठरतात असा अनुभव असतो. परंतु हा इन्टेसिव्ह कोर्स एखाद्या वैद्य-डॉक्टराने लिहून दिलेल्या कोर्सप्रमाणे ठराविक वेळात पुरा केल्यास गुण दाखविणारा ठरेल, याची खात्री वाटते.

डॉ. चिटणीस विरचित 'अॅन इन्टेन्सिव्ह कोर्स इन् मराठी'च्या प्रकाशनाला अनेक सांस्कृतिक संदर्भ आहेत. विविध देशाच्या, वेशाच्या, संस्कृतीच्या व भाषाच्या लोकसमुदायात नवनवीन भाषा शिकण्याचे आकर्षण असते तरी त्यासाठी शास्त्रीय मार्गदर्शन उपलब्ध असेलच असे नाही. किंवा शिकविण्याची इच्छा असणाऱ्यांना देखील साधनसामग्री उपलब्ध नसते. डॉ. चिटणिसाच्या ग्रंथाच्या मदतीने मामुली इंग्रजी संभाषण करू शकणारा (आणि आपली इंग्रजी तशी मामुलीच असते म्हणा!) मराठी भाषिक रुबाबदारपणे मराठी शिकवू शकेल. (एकीकडे शिकविता शिकविता आजवर जे काही शिकायचे राहून गेले तेही शिकता येईल!)

कै. चिंतामणराव कोल्हटकर आपला कौतुकमिश्रित विस्मय व्यक्त करण्यासाठी अमुक गोष्ट म्हणजे "मिस्टर' आहे बघा" असे म्हणत. आपल्यालाही या इन्टेन्सिव्ह कोर्सकडे पाहून मनात वाटू लागते की, मराठी भाषा म्हणजे भलतीच 'मिस्टर' आहे म्हणायची व हा कोर्सही आणखी एक 'मिस्टर' आहे. बऱ्यापैकी मराठी बोलण्यासाठी किती सायास करावे लागतात याचे सव्वाअकराशे पृष्ठात प्रत्यंतर येते. बऱ्यापैकी मराठी शिकविण्यासाठी किती प्रचंड मेहनत करावी लागते याची ही प्रचीती आहे. डॉ. चिटणिसांनी डॉ. कालेलकराच्या गुरुपणाचा गौरवपूर्ण सार्थकच जणू या ग्रंथरूपाने आकाराला आणले आहे. मराठी भाषा शिकू इच्छिणाऱ्यासाठी 'हा तिळा उघड'चा मंत्र व तंत्र लेखिकेने चिरस्थायी स्वरूपात उपलब्ध करून ठेवले आहे. मराठीत ललित ग्रंथ लिहिणाऱ्यांकडून माय मराठीची जेवढी

सेवा घडते, त्याहून ही सेवा दुय्यम स्वरूपाची मानली जाण्याची भीती असते, (कारण आपली अजिबात नसलेली वैज्ञानिक दृष्टी) अशा वेळी साहित्यिक कुणाला म्हणावे, याची रूढ व्याख्या बदलण्याची तीव्र गरज वाटू लागते. तसे रस्तोरस्ती विविध भाषाचे गाईड–छाप – सडक – छाप छापील शिक्षक चोपड्याच्या रूपाने उपलब्ध नाहीत असे नाही; परंतु चिटणीसबाईंची रचना अस्सल चीज आहे. मराठी शिकू इच्छिणाऱ्या मराठी भाषिकासाठी हा द्वैभाषिक 'इन्टेन्सिव्ह कोर्स' अक्षरशः 'फ्रेंड, फिलॉसफर अँड गाईड' स्वरूप आहे.

भाषा हे जसे भावबंधन निर्माण करणारे, तसेच भाऊबंदकी निर्माण करण्याचेही माध्यम असू शकते तेव्हा शासनाने प्रकाशनाची जबाबदारी स्वत' घेऊन भाषांच्या कुंपणातील एक काटा खुडण्याचे काम हा कोर्स प्रकाशित करून केले आहे. ज्यांची मातृभाषा मराठी नाही, त्यांच्यासाठी तर प्रस्तुत कोर्स ही ज्ञानपोई आहे. भाषाच्या 'लॅब्ज्' 'वर्कशॉप्स' असतात हे ऐकून सामान्यजनांना कापरे भरते व शिष्ट टीकाकाराची नाके मुरडतात; पण जर अशी भरदार, रसरशीत फळे येणार असतील तर नागरिक सरकारच्या लँग्वेज–लॅब्ज्, व वर्कशॉप्सकडे टरकून पाहणार नाहीत. हा हा ग्रंथ फळाला आला त्याला १९६६ सालात डॉ. सुमंत कत्रे यानी डेक्कन कॉलेजात सुरू केलेल्या भाषा संशोधनाची पार्श्वभूमी आहे. त्यानंतर डॉ. ना. गो. कालेकर आले. भाषा समृद्ध होते ती साहित्यिकांमुळेच केवळ नव्हे तर संशोधकामुळेही होते, याची फारशी जाणीव आपल्याकडे आढळत नाही. मराठी भाषा परकीयांना शिकविण्याचा प्रयोग, (विशेष करून अमेरिकन लोकांना) अगदी शास्त्रशुद्ध रीतीने सुरू झाला त्यांचे हा ग्रंथ म्हणजे फळ आहे. तीन चार महिन्यात मराठीचे कामचलाऊ ज्ञान ह्या ग्रंथाने नक्की येऊ शकते. या ग्रंथाची विभागणी घडे, ड्रिल्स, अभ्यास, शब्दसंग्रह, व्याकरणविषयक टीपा, उजळणीचे परीक्षणात्मक पाठ व चाचणी अशा शास्त्रीय पद्धतीने करण्यात आले असून, एकूण दर्जा उत्तम (वर्ल्डक्लास) भाषा अभ्यासक्रमांच्या तोडीचा आहे. मराठी भाषिकाना हा ग्रंथ पुनरुक्तीचा व कंटाळवाणा वाटण्याची शक्यता आहे मराठी भाषा शिकविताना अडचणी फार आहेत. कारण मराठी मोठी अवघड भाषा आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर मराठीत तीन लिंगी भाषा व्यवहार आहे व क्रियापदेही तशीच तिन्ही लिंगी बदलावी लागतात. हा ग्रंथ १०–१५ वर्षे मराठी भाषा अमराठी व परदेशी विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्याच्या प्रयोगातून साकार झाला असल्याने त्याचे महत्त्व विशेष आहे. प्रत्येक मराठी पाठाचे इंग्रजी भाषांतर दिले असल्याने, आता मराठी भाषा शिकणाऱ्या व शिकविणाऱ्याची कायमरूपी शास्त्रपूत सोय झाली आहे. राजभाषावर्षात मराठी भाषा शिक्षणाचा सर्वांगीण सखोल अभ्यासक्रम प्रकाशित केल्याबद्दल ग्रंथकर्ती व भारत सरकारच्या भाषा संस्थानाचे अभिनंदन करायला हवे. मराठी भाषा शिक्षणावर पंचवीस परिसंवाद भरविण्यापेक्षा असा भरीव ग्रंथ लिहिणे हीच मराठी भाषेला वाहिलेली अस्सल भावभाषांजली आहे.

मराठी भाषेला उद्देशून जणू हा अभ्यासक्रम 'दार उघड बया आता दार उघड' म्हणतो व आपल्या अंतरंगातील अनेक पाठाच्या व भरपूर उदाहरणांच्या साहाय्याने आळवणी करून अखेर मराठी भाषेला आपले निजरूप उघड करण्यास भाग पाडतो. ग्रंथाची किंमत मराठीत रु. ८०, इंग्रजीत मात्र २० डॉलर्स व आठ पौंड आहे. पृष्ठसंख्येचा विचार करता व मराठी भाषा शिकण्याचा आनंद याचा विचार करता ज्ञानेश्वर, तुकाराम व शिवाजी महाराजांची मराठी भाषा शिकण्याचा आनंद प्राप्त करण्यासाठी ही किंमत फार नाही ही पुढच्या वर्षीच्या महाराष्ट्र शासनाच्या साहित्यिक पारितोषिकाच्या यादीत मराठी व्याकरण व भाषाशास्त्रीय ग्रंथात मराठी भाषा प्रशिक्षणाच्या 'चिटणीसी' बखरीचा क्रमांक लागल्यास आम्हाला भविष्य खरे वर्तविल्याचा आनंद लुटता येईल. ◻

अॅन इन्टेसिव्ह् कोर्स इन् मराठी
डॉ. विजया चिटणीस, प्रिन्सिपॉल, वेस्टर्न रिजनल लँग्वेज सेंटर कॉलेज, पुणे ६
पृष्ठसंख्या : ११२३
मूल्य : रु. ८०/–
प्रकाशक : सेंट्रल इन्स्टिटय़ूट ऑफ इंडियन लँग्वेजेस, म्हैसूर–६

पुण्यात मिळण्याचे ठिकाण :–
वेस्टर्न रिजनल लँग्वेज सेंटर,
डेक्कन कॉलेज, पुणे ४११ ००६


मोठमोठ्याना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... –प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.
तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# रंगभूमी

विनया खडपेकर

# अशा या दोघी

## लेखनात फसलेले पण प्रयोगात बरे

नवनीतनिर्मित ' अशा या दोघी ' नाटकाचा तिसरा प्रयोग तीस नोव्हेंबर या दिवशी संध्याकाळी चार वाजता शिवाजी मंदिर, दादर येथे झाला. या नाटकाचे लेखक आहेत श्री. गंगाराम गवाणकर आणि दिग्दर्शक आहेत श्री. कमलाकर सारंग.

साधेसुधे घरगुती जीवन जगू इच्छिणारी एक स्त्री आणि संपत्तीच्या मागे धावणारी दुसरी स्त्री ' अशा या दोघी ' हा नाटकाचा मुख्य विषय आहे.

माधव–वनिता हे एक जोडपे. दोघे नोकरी करतात. माधव साध्या गृहजीवनाची स्वप्ने पाहणारा. बायकोनी मस्त जेवण वगैरे करावे एवढीच अपेक्षा करणारा. पण वनिता पैशामागे धावणारी. बायकोही नोकरी करते म्हणून सुसंस्कृत, समंजस माधव घरातल्या कामाचा भार उचलतो. त्यांच्याच शेजारच्या ब्लॉकमध्ये विश्वनाथ–प्रतिभा हे जोडपे. नवऱ्याने वेळेवर घरी यावे. त्याला चांगले चुंगले खाऊ घालावे अशी प्रतिभाची इच्छा. पण नवऱ्याकडून या इच्छा पुऱ्या होत नाहीत. त्यात तो पुरुषत्व गमावलेला. प्रतिभा तरीही सहा वर्षे त्याच्याजवळ राहते. पण नंतर मातृत्वाच्या इच्छेने व्याकूळ होते. स्वतःच्या अब्रूसाठी विश्वनाथ तिच्यासाठी निरनिराळ्या पुरुषांना आणायला तयार असतो पण तिला ते आवडत नाही. मग नवऱ्याकडून मारहाण, छळ. प्रतिभा, माधव यांना प्रथम एकमेकांबद्दल सहानुभूती वाटते. मग एकमेकांचा आधार वाटू लागतो. मग प्रेम निर्माण होते. शेवटी दोघे मिळून निघून जाण्याचा निर्णय घेतात. पण विश्वनाथ कपटाने प्रतिभाला नागेशजवळ सोडून जातो. माधव बाहेरून दार ठोठवित राहतो. येथे नाटक संपते.

ऑफिसमधला बॉस–बाई, पौरुषत्व गमावलेला पुरुष असे हे आपले नेहमीचेच सगळे. नेहमीचे म्हणजे नाटकातले नेहमीचे, प्रत्यक्षातले नेहमीचे नव्हे. प्रत्यक्षातले नेहमीचे आणि नाटकातले नेहमीचे यात फरक असतो. प्रत्यक्षात आपण पाहतो घाईने स्वयंपाक उरकून, मुलांचे आवरून स्वतःची साडी कशीवशी गुंडाळून ऑफिसमध्ये धावणाऱ्या बायका व संध्याकाळी ऑफिसमधून आल्याबरोबर ओटचापुढे उभ्या राहणाऱ्या बायका. पण नाटकातल्या बायका मात्र वेगळ्या. त्यातल्या शेकडा नव्वद बायका बॉसला लागू, पैशासाठी बॉसला किंवा अन्य कोणाला देहविक्रय करणाऱ्या. साहित्य समाजाचा आरसा मानला तर आमच्या समाजाची फार भयंकर स्थिती मानावी लागेल. असो.

हे वास्तव, अवास्तव सोडले. नाटकात फक्त अपवादात्मक विषयच निवडला असे मानले तर त्या अपवादात्मक विषयाची मांडणी तरी निर्दोष, पटणारी, समजणारी आहे का ? नाही. माधवाची मासिकातली कथा जेव्हा प्रतिभा विश्वनाथला सांगते तेव्हा शेवटी असह्य होऊन तो पुरे म्हणून ओरडतो. याचे कारण नीट स्पष्ट होत नाही. असे काही त्याच्या आयुष्यात घडले असेल असे मानायचे ! माधव घरात काम करतो त्याच्या समंजस स्वभावामुळे. पत्नी नोकरी करते म्हणून तिच्यापुढे तो मिंधा आहे असे बोलण्या–वागण्यातून वाटत नाही. तरीही हल्लीच्या जमान्याच्या रितीप्रमाणे मध्यमवर्गीय भेकडपण अधून मधून त्याच्यावर लादले आहे. वनिता आल्यावर निर्णय घेऊ असे तो प्रतिभाला म्हणतो तेव्हा किंवा वनिता त्यांच्या अंगावर येता जाता वसकन् ओरडते तेव्हा भेकडपण आपले दाखवन घेतले आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाशी ते सुसंगत नाही. शेवट अर्धवट वाटतो. माधव प्रतिभाला बलात्कारापासून वाचवू शकत नाही. एवढेच कळते. मांडलेला प्रश्न शेवटी अर्धवट सोडल्यासारखाच वाटतो. प्रतिभाचे दुःख अगदी क्वचित् वाटचाला येणारे दारूण दुःख आहे. पण त्या गांभीर्याने ते नाटकात येत नाही. नवरा मारहाण करतो, नीट वागवीत नाही म्हणून होणारे दुःख वेगळे. नवरा पौरुषहीन असल्यामुळे वाटचाला येणारे जगावेगळे दुःख, शारीरिक, मानसिक ताण यांचे स्वरूप फार वेगळे आहे. पण येथे या दोन्हीत फरक केलेला नाही. पौरुषहीनतेचा उपयोग फक्त काहीतरी सनसनाटी दाखविण्यासाठी केला आहे.

दोन विरुद्ध स्वभावाच्या स्त्रिया हा लोकप्रिय विषय निवडला, त्याला लैंगिकतेचा सनसनाटी मसाला घातला आणि बनविले असे हे नाटक.

नाटकाचा प्रयोग मात्र एकंदर ठीक होतो. कलाकारांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे अडीच तास कंटाळा येत नाही. श्री. कमलाकर सारंग ( विश्वनाथ ) आणि श्री. जयराम हर्डीकर ( माधव ) यांचे अभिनय विशेष उल्लेखनीय वाटतात. इतर कलाकार रिमा लागू ( वनिता ), लालन सारंग (प्रतिभा), लिलाधर मयेकर ( वसंत ) नितीन मंत्री

( मुका ) यानी आपापल्या भूमिका योग्य भानाने केल्या आहेत. धनंजय भावे (किणी) याचे रंगमंचावरील एकंदर व्यक्तिमत्व, शरीरयष्टी पाहून हा पोरी फिरवणारा, गुर्मीत राहणारा बॉस आहे असे वाटत नव्हते. कोणतातरी कारकून उगाचच बॉसच्या रूबाबदार पोषाखात आला आहे असे वाटत होते.

लेखनात फसलेले पण प्रयोगात बरे असे हे नाटक आहे. *

# परपुरुष

## अगदी सुमार

नाटक सुरू होण्याआधी 'एक कौटुंबिक खळबळजनक' नाटक अशी त्यावद्दलची घोषणा केली जाते. 'कौटुंबिक जिव्हाळ्याचे' नाटक म्हटले की, 'वहिनी-भावजी', 'दादा-ताई', 'दुर्वा-तुळस' वगैरे मंडळी माहितीतली झाली आहेत. आता कौटुंबिक खळबळजनक म्हणजे काय दाखवतात हे बघायला मन उत्सुक झाले.

बघितले तर काय– कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकाचे सारे तेथे होते. सुखवस्तू अप्पासाहेबाच्या गुणी मुलाला, तितकीच गुणी कवितानामक पत्नी मिळते. ती पतीपरायण आहे. धाकट्या दीरावर पुत्रवत प्रेम करते. त्याच्या मित्रांना नेहमी चहापाणी करते. सासऱ्याचे हवे नको पाहते. सबंध पहिला अंक तिचे प्रेमळपण तपशीलवार दाखवण्यात खर्ची केला आहे आणि नंतर हे कौटुंबिक नाटक केल्या घोषणेला जागून खळबळजनक करून सोडले आहे. ही खळबळ निर्माण तरी कशामुळे होते? अप्पाजीच्या मित्राच्या काकाजीच्या स्वभावामुळे किंवा दोघांच्याही स्वभावामुळे. काकाजीची सून पळून जाते म्हणून अप्पाजी त्यांना टोचून बोलतात. काकाजी दुखावतात. (हा प्रसंग पहिल्या अंकात सुरवातीला दोन मिनिटात उरकला आहे.) काकाजी सूडाने पेटून स्वत च्या पुतण्याला पैशाची लालूच दाखवून कवितेला फितविण्याचा व्यूह रचतात. यशस्वी होतात. त्या आघाताने अप्पाजी जबरदस्त आजारी होतात. काकाजी त्याचा खून करून आळ त्यांच्याच मुलावर घालू पाहतात. पण त्याचा कट उघडकीला येतो. शेवटी पकडले जातात. पुतण्यालाही पश्चात्ताप होतो.

अशी ही फिल्मी स्टोरी 'परपुरुष' या नाटकातून दाखविली आहे. चित्रपटात सिनसीनरी असते. नटनटया, आशा-लता वगैरेंच्या मधुर आवाजात गात बर्फात, हिरव्यागार गवतात लोळतात. त्या जोरावर असल्या सवंग कथा ढकून नेल्या जातात. पण नाटकाची कथा पोचट असेल, स्वभावचित्रे स्पष्ट नसली तर प्रेक्षकांना कशाच्या जोरावर खेचून घेणार? 'या मंगळसूत्राची ताकद मला बांधून ठेवते आहे' 'घर कधीच चार भिंतीवर उभ राहत नाही. ते गृहलक्ष्मीच्या पावलावर उभं राहतं.' ही असली वाक्ये आता किती बुळबुळीत झाली आहेत! ही या नाटकात पुन पुन्हा घोळली होती. ही वाक्ये म्हणायला सुरुवात झाली की प्रेक्षक हसू लागत.

मित्राच्या साध्या बोलण्यानं चिडून जाऊन त्याचे घर उद्ध्वस्त करण्याचा व्यूह रचण्याचा काकाजीचा अतिरेकी स्वभाव नाटकात आधी नीट दिसण्याची आवश्यकता नव्हती काय? सुरुवातीला काकाजी नमस्कार करणाऱ्या कवितेला आशिर्वाद देतात आणि तिच्या नवऱ्याकडे मात्र पाठ फिरवतात, यातून काय सुचवायचे आहे? कवितेच्या दीराची प्रेयसी अनिता हिच्या अचानक ब्रेन टयूमरने कथानकात काय साधले आहे? एक ना दोन असे कितीतरी दोष.

नाटकाचा प्रयोगही सुमारच होता. सुरुवातीला नुकतेच बाहेर म्हणजे घराच्या अंगणात कोठेतरी लग्न झाल्याचा उल्लेख आहे. पण खोलीच्या वातावरणात कोठे लग्नाचा मागमूस नाही. कविताचा भाऊ एकटाच सूटकन् तिचा निरोप घेऊन जातो. हे दृश्यही विचित्रच वाटते. पात्रे पुष्कळ ठिकाणी 'न' आणि 'ण' याच्या उच्चारांची अदलाबदल करतात. 'सुनेला' ऐवजी 'सुणेला' म्हणतात.

लेखनात आणि प्रयोगात अगदीच सुमार असलेले हे नाटक आहे. चेतननिर्मित या नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक आहेत श्री. सदानंद दळवी. रवी पटवर्धन (अप्पा), लिलाधर कांबळी (काकाजी), ज्योती दाभोळकर (कविता), वैशाली विचारे (अनिता), राजा चव्हाण (सजय), तुलसी बेहेरे (सुनील), दशरथ भानुशाली (शेखर) नितीन गुप्ते (इन्स्पेक्टर), शामसुदर आंबेकर, सुरेश गोसावी (हवालदार), विजय नागरे (चंदर), बबन चव्हाण (मनीष), सदानंद दळवी (राजेश) या कलाकारानी या नाटकात भाग घेतला आहे. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

# चित्रपट

सदानंद बोरसे

# अिकरार

## एक प्रेक्षणीय रहस्यपट

रात्रीची वेळ. खंडाळ्यामधला एक बंगला. बंगल्यातून पियानोचे सूर येत आहेत. एक गाडी सरसरत बंगल्यापाशी येते. एक माणूस गाडीतून उतरून बंगल्यात शिरतो. काही वेळाने पियानोचे सूर थांबतात. आणखी काही वेळाने गोळीचा धडाका ऐकू येतो. तो माणूस छाती दावत भेलकांडत बाहेर आलेला. त्याच्यामागोमाग हातात बंदूक घेतलेली एक तरुणी. तिचे कपडे अस्ताव्यस्त, फाटलेले. ती त्याच्यावर आणखी एक गोळी झाडते. त्याचे निःष्प्राण शरीर बंगल्याच्या फाटकावर कोसळते आणि त्या तरुणीच्या तोंडून भीषण किंकाळी फुटते.

त्या माणसाच्या प्रेमप्रकाशच्या पाशवी वासनेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी त्या तरुणीने—दीपा मल्होत्राने त्याला ठार मारले, हा बचाव मान्य करून दीपा मल्होत्राची खुनाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते; पण सुटका झाल्यानंतरही दीपा वेगळ्याच भोवऱ्यात सापडते.

डॉली—प्रेमप्रकाशची नियोजित वधू एका पत्राच्या मदतीने दीपाला ब्लॅकमेल करू पाहते. दीपाचा पती सुनील आणि मानलेला भाऊ रोहित तिची काळजी घेत असल्याचे नाटक करीत तिला वेडी ठरवू पाहतात. दीपाला निरनिराळे भास होतात.

'हे सगळे काय आहे ? मला खरोखरच भास होतांहेत की हे सगळे लोक एकजुटीने माझ्याविरुद्ध कट रचताहेत ? मी खरोखरच वेडी बनते आहे की मला वेडी बनवण्याचा या लोकांचा डाव आहे ?' या आणि अशाच प्रश्नांच्या आवर्तामध्ये गरगरणारी गोंधळलेली दीपा हळूहळू स्वतःवरचा ताबा गमवू लागते. आणि एके रात्री—

एव्हाना या सगळ्या रहस्यमय प्रकरणात प्रेक्षक चांगलाच गुरफटून गेलेला असतो. संपूर्ण चित्रपटकथा इतकी गुंतागुंतीची, उत्कंठावर्धक आहे की, एके रात्री काय घडले, ते कुणी सांगण्या व वाचण्यापेक्षा 'या पुढील भाग प्रत्यक्ष रुपेरी पडद्यावरच पहा.' असेच म्हणणे जास्त योग्य ठरेल.

चित्रपटाची कथा कैलाश अडवानी यांची आहे. चित्रपटाचे दिग्दर्शकही तेच आहेत. संपूर्ण कथा चांगलीच खिळवून ठेवणारी आहे. (ही कथा 'Nightwatch' या इंग्रजी चित्रपटावर आधारित आहे. अशी माहिती माझ्या एका मित्राने पुरवली. तसे असले तरी चांगल्या मालाची उचल करण्याचे श्रेय तरी कैलाश अडवानींना द्यायलाच हवे.) तसे पाहिले; तर वेगाने एकापुढे एक घडत जाणाऱ्या घटना आणि या सगळ्या विणल्या गेलेल्या जाळ्याला नाट्यपूर्ण कलाटणी देणारा शेवट ही दोनच चित्रपटांची वैशिष्ट्ये; पण या समर्थ कथाबीजामुळे सर्व कलाकारांचा सुमार अभिनय, ठिगळलेली गाणी, सदोष छायाचित्रण इत्यादी बाकी गोष्टींवर मात करून चित्रपट प्रेक्षणीय बनला आहे. रहस्यपटाला आवश्यक असलेला वेग कैलाश अडवानींनी जाणीवपूर्वक ठेवला आहे. खऱ्या खुनीपासून प्रेक्षकांचे लक्ष दुसरीकडे वळविणे आणि त्यासाठी निरनिराळ्या व्यक्तींचा वा घटनांचा उपयोग करणे ही रहस्यपटातील एक हमखास बाब. कैलाश अडवानींनीही तिचा वापर केला आहेच; पण मूळ गोष्टीच्या वेगळेपणामुळेच हा वापर विलक्षण उठावदार बनला आहे. शिवाय नायक वा नायिका म्हणजे सर्वगुणसंपन्न, पापभीरू अशी एक प्रतिमा हिंदी चित्रपटात असते आणि प्रेक्षकांवरही या प्रतिमेचा इतका जबरदस्त पगडा असतो की, चित्रपटाच्या सुरुवातीपासूनच प्रेक्षकांची सहानुभूती त्यांच्याकडे दुथडी भरून वाहू लागते. त्यांच्या प्रत्येक बऱ्या-वाईट गोष्टींकडे याच सहानुभूतीच्या चष्म्यातून पाहिले जाते. त्या दृष्टीनेही 'इकरार'चे वेगळेपण उठून दिसते. (यापेक्षा जास्त खुलासा करून 'इकरार'चे रहस्य मी फोडू इच्छित नाही.)

कलाकारांच्या बाबतीत—

रामेश्वरी आणि अमरीश पुरी यांचा अपवाद वगळल्यास बाकी कलाकारांनी चित्रपट बिघडवला नाही इतकेच. सुरुवातीला खुनाच्या धक्क्याने हादरलेली, त्या आरोपातून सुटण्यासाठी धडपडणारी, नंतर सुनीलच्या प्रेमामुळे सावरलेली पण परत जर कोणी पूर्वघटनेचा संदर्भ दिला तर लगेच अस्वस्थ होणारी, आपल्याला पेचात पकडू पाहणाऱ्या डॉलीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी झगडणारी, आपला नवरा, मानलेला भाऊ सारेच आपल्याला वेडी ठरवू पाहताहेत, या प्रचंड ताणाखाली तडफडणारी दीपा रामेश्वरीने सुरेख उभी केली आहे. तीच गोष्ट अमरीश पुरीने सादर केलेल्या रोहितची.

'इकरार'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रहस्य नामक प्रकार चित्रपटाचा अविभाज्य आणि महत्त्वाचा घटक म्हणून येतो आणि चित्रपटही निखळ रहस्यपटच राहतो. अन्य हिंदी चित्रपटांप्रमाणे सर्व रसांचे सवंग मिश्रण करून त्याला चवीपुरते फुटकळ रहस्य पुरवायचे असा प्रकार या चित्रपटात नाही. चित्रपटात घडणारी प्रत्येक घटना, प्रत्येक संदर्भ, प्रत्येक तपशील म्हणजे त्या रहस्यबिंदूभोवती विणला जाणारा एकेक धागा आहे. याला अपवाद म्हणजे चित्रपटातील गाणी. ती असून-नसून काहीही फरक पडला नसता. गीतकार कुलवंत जानी व संगीतकार भप्पी लाहिरी. एरव्ही ऐकायला मात्र सगळीच गाणी बऱ्यापैकी गोड आहेत.

दोन वर्षांपूर्वी आलेल्या 'इन्कार'नंतर एक चांगला रहस्यपट पाहिल्याचे समाधान 'इकरार'ने दिले. □

## सप्रेम नमस्कार....

### मुखपृष्ठ २ वरून

लोण खडकीत पोहोचले तेव्हा .आंबेडकर हॉस्पिटलचे नाव काढून टाकायला हेच पुणेकर सरसावले होते. कुलगुरू पदासाठी अमुक माणूस दलितासाठी कार्य करतो म्हणून तो नको, इथपर्यंतही पुण्याची मजल गेली होतीच.

बारकाईनेच निरीक्षण करायचे झाले तर पुण्यातील लोकाशी थोडी 'मागासलेल्यांच्या सवलती 'बाबत चर्चा करा. पुरुषोत्तम करंडकच्या १९७८ च्या स्पर्धेतील एका एकांकिकेतील 'नोकरी लगेच मिळायला कांबळे किंवा गायकवाड असायला हवे,' हे वाक्य काय सुचवते ? खेडयातील लोक प्रतिगामी असतात. नवोदित विचारांना ते लवकर सामोरे जात नाही म्हणून तिथे अस्पृश्यतेचे अनुभव येणे साहजिक आहे असे मला पूर्वी वाटत होते. म्हणून 'होरा' साप्ताहिकात व मॉडर्न महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकात मी माझे 'काटयांच्या आतलं जगणं' उघड केलं. परंतु ह्या पाच वर्षात अनुभवलेले पुणेकराचे अनुभव साधे नाहीत. अनुभव तेच, फक्त स्थळ आणि काळाचा बदल ! काही लोक म्हणतात, 'दलित साहित्यात तोचतोचपणा जाणवतो.' हयाचे कारणच हे आहे. कोणत्याही दलिताला आजच्या समाजात माणसाचे जीवन जगायला मिळत नाही तो काय हया संस्कृतीचे गोडवे गाणार आहे थोडाच ?

पाकिस्तान वेगळा झाला. त्याच्यात कितीही अराजक माजले असले तरी 'तू अमक्या जातीचा आहेस म्हणून तुला अशी वागणूक' असे तर नाही ना ? मात्र दलितांनी ह्या देशात दलितेतराशी एकरुप होण्याचा प्रयत्न करूनही जर ते त्यांना 'माणूस' म्हणून पहात नसतील तर मग मागे दलितस्थानची मागणी झाली ती काय चूक होते ? मराठवाड्याच्या दंगलीत वित्तहानीपेक्षा प्राणहानी किती झाली ? कमीतकमी दलितस्थान झाले तर दलित व दलितेतर हा प्रश्न तरी राहणार नाही.

मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर झाले तर दलिताच्या भाकरीचा प्रश्न सुटणार आहे असे नाही. परंतु जर 'नामातरविरोधी' लोकांच्या भावना नामांतर केल्याने दुखावतात तर दलितांच्या भावना 'नामातर' न केल्याने दुखावणार नाहीत का ? असेब्लीत पास होणाऱ्या ठरावाची अंमलबजावणी केवळ दलित व दलितेतर ह्यामधील अंतरामुळे होऊ शकत नसेल तर ही गोष्ट महाराष्ट्रालाच काय पण संपूर्ण देशाला देखील लाजीरवाणी नाही का ?

म्हणजेच या देशात आंबेडकराचे महत्व पटवून देण्यासाठी नव्हे (त्याची आवश्यकताही नाही) तर सर्व माणसे सारखीच असतात हे दाखवून देण्यासाठी तरी नामातर झाले पाहिजे. कदाचित ह्या नामांतराच्या प्रश्नातून पूर्वीइतकीच दंगल उसळण्याचा संभव आहे. परतु त्यालाही तोंड द्यायला दलित समाज आज मागे-पुढे पहाणार नाही. आता प्रश्न आहे तो फक्त नामांतर विरोधी जनतेपुढे की, 'अजूनही आपण अश्मयुगात वावरत आहोत काय ?' त्याचे उत्तर नामांतरास विरोध झाल्यास 'होय' खेरीज काय सापडणार ? मग मात्र त्याची कीव करण्याखेरीज दुसरा पर्याय नाही. □

### पाटीलबुवा आंधळे यांचे उत्तर

कोणत्याही सामाजिक प्रश्नाला राजकीय स्वरूप प्राप्त झाले म्हणजे समाजात तणाव होऊन विध्वंसक परिस्थिती निर्माण होते. आणि त्या परिस्थितीचा फायदा वेगळेच लोक घेतात हे दाखवण्याचा प्रयत्न मी माझ्या लेखात केला होता. तसेच मराठवाडयाच्या विकासाचा प्रश्न राजकारणी लोकानी कसा लोबकळत ठेवला आणि नामांतराचा प्रश्न हिरीरीने कसा हाताळला हेही दाखवण्याचा यत्न केला होता. हे दाखविण्यासाठी नामांतरवादी आणि विरोधी या दोन्हीच्या मधला पवित्रा मी पसंत केला होता.

दलिताची दुःखे वेशीवर टांगण्यासाठी आतापर्यंत जे सामाजिक प्रयत्न झाले त्यापैकी महाडच्या तळ्यातील पाण्यासाठी केलेला सत्याग्रह आणि त्यानंतर विद्यापीठ नामातरासाठीचा सत्याग्रह. लाँग मार्चद्वारे मराठवाडयातील लोकाचे जे सामाजिक शिक्षण होत आहे ते महत्त्वाचे असल्यामुळे लाँगमार्च आणि नामांतरासाठी अवलंबिलेला मार्ग याला माझा सक्रिय पाठिंबा आहे.

नामातरविरोधी फक्त उच्चवर्णीय समाजच नाही तर इतरांचाही त्यात भरणा आहे. जोपर्यंत माणसाला माणूस म्हणण्याची प्रवृत्ती या देशात येत नाही तोपर्यंत संघर्ष हा चालूच राहणार आणि चालू ठेवणे आवश्यक आहे.

घोटभर पाणी आणि कोरभर भाकरीच्या तुकडयासाठी आज दलित समाज मरणाच्या यातना भोगीत असताना नामांतराच्या प्रश्नासाठी बलिदान करायला तयार आहेत, याचे कारण आम्हीही माणसेच आहोत हे सिद्ध करणे, हे खरे आहे, परंतु आज मराठवाडयातील दलित दिशाभूल झाल्यासारखा आहे. दुसऱ्या महायुद्धात इग्लंडच्या एका सेनापतीने इग्लंडच्या सैन्याची अवस्था सांगितली होती. तो म्हणतो 'कुठे जायचे आणि कोणावरोबर लढायचे हे आम्हाला माहीत नव्हते, परंतु नुसत्या शस्त्राच्या खणखणाटाने आम्ही भारावून गेलो होतो.' तशी अवस्था आज मराठवाडयातील दलितांची आहे.

दलित आणि दलितेतर यांच्यातील दरी कमी व्हावी म्हणून नामांतरासाठी अवश्य झगडावे, परंतु याचा फायदा इतर लोकानी घेवू नये याचा विवेक पाळावा. □


आवृत्ती संपत आली....

# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक :
विनय हर्डीकर
मूल्य :
वीस रुपये
राजहंस प्रकाशन
पुणे ३०

नामांतर आंदोलन दडपण्याच्या गडबडीत असलेल्या शासनाचे इकडे लक्ष केव्हा जाणार ?

# पंढरपूरजवळच्या एका गावात....

माननीय मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मुंबई–३१

यांना समस्त महार मंडळी गुरसाळे याचे निवेदन.
विषय :– हातभट्टी दारू गाळणाऱ्या समाजकंटक गावगुंडाच्या टोळीचा कडक बंदोबस्त व्हावा अशी महाराष्ट्र शासनास विनती.

महोदय,

दिनांक २१।४।७९ रोजी मा. नामदार गणपतराव देशमुख, कृषिमंत्री याच्या शुभ हस्ते परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा ८८ वा जयंतीउत्सव यशस्वीरीत्या पार पाडला. दुसरे दिवशी तावडतोब दिनाक २२–४–१९७९ रोजी बेकायदेशीरपणे हातभट्टी दारू गाळणाऱ्या कोळेकरांच्या गावगुंडाच्या टोळीने, ' मंत्र्याकडे तक्रारी करता काय ' म्हणून हरिजनांना रस्त्यात अडवून, आडरानात एकटया-दुकटयाला गाठून मारझोड करण्यास सुरवात केली आणि दहशतीचे व भीतीचे तंग वातावरण निर्माण केले. ता. २२–४–७९ रोजी मारहाण केल्याची फिर्याद २३–४–७९ रोजी तालुका पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली आहे. नंतर २६–४–७९ रोजी सविस्तर दुसरी फिर्याद दिली आहे.

या दोन्ही फिर्यादी दिल्यावर तर गुडगिरीचे प्रमाण वाढले आणि हरिजनांना व त्याना सहकार्य करणाऱ्याना, वाटेत, आडरानात एकटयादुकटयाला गाठून मारहाण करण्याचे, गुडगिरीचे व दहशतीचे प्रमाण, कमी होण्याऐवजी वाढले. त्याविरुद्ध दि. ६–६–७९ व दि. ८–६–७९ रोजी हरिजनानी फिर्यादी नोंदविल्या आहेत. आणि पोलीस संरक्षणातच हरिजनानी त्याच्या जमिनीची नागरट केली.

वेटातील महादेवाच्या गळकीचा सागता समारंभाचा भंडारा होता. गावकऱ्यानी हरिजनाना प्रसादास बोलावले होते. हरिजन प्रसादास जमले असता या गावगुडाच्या टोळीने हरिजनावर दगडफेक केली व त्यांना हुसकून लावण्याचा चंग बाधला होता. परंतु गावकऱ्यानी मध्यस्थी करून हरिजनाना कसेबसे वाचविले. तरीसुद्धा त्याची गुडगिरी कमी झाली नाही. दि. १०–७–७९ रोजी रामचद्र नाना जाधव या शेतकऱ्यावर कोळेकराच्या टोळीने काठ्या-कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला केला. जाधवाचा एक हात व एक पाय मोडला. डोक्यावर व नडग्यावर कुऱ्हाडीचे वार केले. फिर्याद नोदविलेली आहे. गुन्हेगाराना अटक केल्याचे नाटक केले. कागदोपत्री अटक दाखविली. परंतु गुन्हेगार पोलिसांबरोबर गावभर हिंडत होते. आणि कोणी आमचं काय वाकडं केलं म्हणून शिवीगाळ करीत होते.

लगेच दुसरे दिवशी दि. ११–७–७९ रोजी या गुडानी महारवाड्यावर हल्ला चढविला. परंतु त्याच्या कालव्याचा सुगावा लागल्यामुळे हरिजन मंडळी वस्त्या सोडून पळून गेली. दडून लपून बसले म्हणून बिचारे वाचले. महारवाड्यात येऊन या गुडांनी हरिजनाच्या बायकामुलांना अचकट विचकट शिवीगाळ केली ही फिर्याद दिली आहे. एवढला फिर्यादी देऊनही गुडगिरी कमी झाली नाही. हे गुड टोळी-टोळीने फिरतात. रामपुरी सुरे, जंबीये, चेनस्, लोखंडी गज दाखवून हरिजनांना सहकार्य करणाऱ्या लोकाना व हरिजनांना दमदाटी देतात. गावात दहशतीचे व भीतीचे तग वातावरण आहे. पढरपूरला जायच्या रस्त्यासच या गुंडाच्या वस्त्या व सिमेट कॉंक्रीटची घरे आहेत. त्यामुळे एकटा-दुकटा माणूस पंढरपूरला जाऊ येऊ शकत नाही.

या कोळेकर गुडाच्या टोळीने हरिजनाना भाडोत्री बैलही मिळू दिले नाहीत. ' कोण भाड्या पेरायला येतो त्याची जाधवासारखी अवस्था करून सोडू ' अशी दमदाटी करीत आहेत. लांबची परगावची बैलं भाड्याने लावून हरिजनानी जमिनीची पेरणी केली. कासेगाव, देगाव, शेगाव येथील बैलं लावली होती. ३५ बैलजोड्या दोन दिवस लावून हरिजनांनी त्यांची जमीन पोलीस संरक्षणात पेरून घेतली.

जोंधळा चागला उगवून आला आहे. त्या उभ्या [जोंधळचात या कोळेकराची जनावरे घातली व पीक राखणदारावर काठचा-कुऱ्हाडी घेऊन मारहाण करण्यास धावून गेले. राखणदार हरिजन पळून तालुका पोलिस स्टेशनला फिर्याद देण्यास आले. मुख्य फौजदार नाही म्हणून कोणीच हरिजनाची दाद घेतली नाही. त्यामुळे हरिजनानी मे. प्रात ऑफिसरची भेट घेऊन उपोषणाची नोटीस दिली. प्रातानी] तालुका पोलीस स्टेशनला फोनवर हकीकत सांगितली. त्यानी असिस्टंट पी. एस्. आय. व दोन कॉन्स्टेबल पाठविले. त्यानी पीक चारल्याचे पाहिले, व हरिजनांच्या पेरलेल्या जमिनीत पीक उपटून टाकून या गुंडानीं दारूची हातभट्टी लावली होती व रसायनाचे डबे पुरलेले सापडले. एक तांब्याचा मोठा हंडाही जप्त केला होता. परंतु या टोळीच्या प्रमुखाने 'पोरांनो, आणारे काठचा-कुऱ्हाडी, दाखवू या फौजदाराला आणि पोलिसांना ' म्हणून काठचा-कुऱ्हाडीचा धाक दाखवून फौजदार व पोलिसांच्या ताब्यातला हंडा हिसकावून घेऊन गेले. हा भयानक गुंडगिरीचा प्रकार पाहून हरिजनात फारच घबराट निर्माण झाली. त्यांनी या ' भयानक गुडगिरीचा कडक बंदोबस्त करा व त्याच्या सर्व दारूच्या भट्टचा बंद करा ' म्हणून बायका मुलासकट पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये सत्याग्रह सुरू केला. कारण ड्रेसवरच्या फौजदारावर व पोलिसावर हल्ला केला व मुद्देमाल पळविला तरी पोलिसखाते या गुडाच्याविरुद्ध काहीच करू शकत नाही. म्हणजे गुडाचेच राज्य आहे. शासन कोलमडले आहे. शातता आणि सुव्यवस्था गडगडली आहे. गावगुड, हातभट्टीवाले याचेच राज्य आहे म्हणून हरिजनांनी ४८ तास सत्याग्रह केला. नंतर डि वाय. एस्. पी., सी. पी. आय., पी. एस्. आय. यानी कडक बदोबस्त करण्याचे आश्वासन दिले व हरिजनाना पोलीस संरक्षण देण्याचेही कबूल केले. तेव्हा धरणे उठले.

महाराष्ट्र राज्य लाल बावटा युनियनचे सरचिटणीस भाई सर्जेराव सगर हेच त्या हरिजनाना व शेतमजुराना मदत करतात. तेव्हा त्या भाई सगराचाच काटा काढू, असे उघडउघडही गावगुंडाची टोळी बोलत आहे व भाई सगरचा खून करण्याचा कट रचला जात आहे. तेव्हा या बेकायदेशीर हातभट्टीच्या दारू गाळणाऱ्या गावगुडाच्या टोळीला पोलिसाचे सरक्षण आहे, हप्त्याच्या आमिषाला बळी पडून पोलिस अधिकारी काहीही परिणामकारक कडक कारवाई करू शकत नाहीत. जिल्हा पोलीस प्रमुखाला निवेदन दिलेले आहे. परंतु अद्याप काहीही कारवाई झाली नाही.

वरील सर्व परिस्थितीचा गभीर विचार करून या गुडांच्या टोळीचा चोख बंदोबस्त करावा. त्यांचा बेकायदेशीर चालू असलेला हातभट्टीचा दारू गाळण्याचा धंदा कायमचा बंद होईल अशी अपेक्षा आहे. नाहीतर गोरगरिबाना स्वतःचे संरक्षण स्वत.च करावे लागेल. त्यावेळी मात्र पोलिसानी तेथे अजिबात हस्तक्षेप करता कामा नये. तरी शासन जिवंत आहे का ? याचा या गंभीर विचार करावा. आम्हा हरिजनांवरील अन्याय अत्याचार कसे बंद होतील याची व्यवस्था करावी. ही विनंती.

दिनांक : ११–९–७९

आपले नम्र
**समस्त महार मंडळी,**
गुरसाळे

१. एम्. एस्. रणपिसे
२. मारुती लक्ष्मण रणपिसे
३. तानू संभार पिसे
४. नियां वामन लेहना रणपिसे
६. नियां अशोक शंकर रणपिसे
६. नियां सत्यवान तुकाराम रणपिसे
७. निआं मोहन गुलाब रणपिसे
८. निआं भिमराव गजेन्द्र रणपिसे
९. निआ मधुकर खंडू रणपिसे
१०. निआं केरबा भागवत रणपिसे
११. निआ संतराम लक्ष्मण रणपिसे
१२. निआं जगन्नाथ लक्ष्मण रणपिसे
१३. निआ प्रभावती हरिश्चंद्र गायकवाड
१४. निआं संभू शिवराम रणपिसे
१५. निआं नामदेव शिवराम रणपिसे
१६. निआ मनोहर गुलाब रणपिसे यांचा असे

दस्तूर सर्वांसाठी
एम्. के. रणपिसे.

MANOOS (Marathi Weekly) 75 Paise Regd. No. PNC-68


# सावली सोडील साथ
# पण संचित देईल हात !

आमच्या 'संचित ठेव' योजनेमध्ये गुंतवणूक करा........
भविष्यकाळाची उत्तम तरतूद करा.
किमान ठेव १०० रुपये. मुदत १२ ते १२० महिने........
फक्त तुमच्या ठेवीवरच नव्हे,
तर त्या वरील व्याजावरही तुम्हाला व्याज मिळेल........
एवढे की ६३ महिन्यांनी दीड-पटीहून अधिक तर
१२० महिन्यांनी दुपटीपेक्षा जास्त रक्कम तुम्हाला परत मिळेल.

तपशीलासाठी आपल्या जवळच्या आमच्या शाखेला भेट द्या....

## बँक ऑफ महाराष्ट्र

[भारत सरकारचा उपक्रम]

मुख्य कार्यालय : 'लोकमंगल', पुणे ४११ ००५

बँकिंग सेवा + व्यक्तिगत जिव्हाळा.